दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

घटस्थापना

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१७० | शुक्रवार, दि.११ ऑक्टोबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या दुसऱ्या टप्प्यास मंत्रीमंडळाची मंजुरी

## कृषी मंत्री धनंजय मुंडे यांची माहिती; नव्या ७ हजार गावांचा समावेश



**मुंबई । प्रतिनिधी**

**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवणे केंद्र सरकारच्या ॲग्रिस्टॅक या योजनेस मंजुरी देणे राज्यातील कृषी विद्यापीठांमधील प्रकल्पग्रस्तांच्या पदभरतीस मंजुरी आणि बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्रास अतिरिक्त निधी देण्यास आज-गुरुवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेला राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.**

राज्यातील निवडक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हवामान बदलांमुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम करणे आणि शेती व्यवसाय किफायतशीर करण्यास सहाय्य करणे या उद्देशाने राज्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प राबविण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात ५२८४ गावांचा समावेश होता. दुसऱ्या टप्प्यात सद्यस्थितीत समाविष्ट असलेल्या १६ जिल्ह्यांसह विदर्भातील उर्वरित नागपूर भंडारा गोंदिया चंद्रपूर व गडचिरोली आदी २१ जिल्ह्यातील ६९५९ गावांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी अंदाजित खर्च ६ हजार कोटींचा असून त्यासाठी जागतिक बँकेचे अर्थसहाय्य घेण्यात येणार आहे. राज्यातील कृषि क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करुन शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने व परिणामकारकरित्या लाभ शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे याकरीता केंद्र शासनाची ॲग्रिस्टॅक डिजिटल ॲग्रिकल्चर मिशन योजना राज्यात राबविण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत माहिती निर्मिती कक्ष, शेतकरी माहिती संच, हंगामी पिकांचा माहिती संच आणि भूसंदर्भाकीत भूभाग असणारे गाव नकाशे माहिती संच महसूल विभाग तयार करेल. यासाठी माहिती वापर कक्षाची स्थापना कृषि विभाग करेल. या साठी सुकाणू समिती, अंमलबजावणी समिती, क्षेत्रिय स्तरावर विभागस्तरीय,

पान २ वर

# आ.क्षीरसागरांनी घेतली तहसिल कार्यालयाची आढावा बैठक

### नागरिकांची कामे तात्काळ मार्गी लावण्याच्या सूचना



**बीड । प्रतिनिधी**

मतदारसंघातील नागरिकांचे प्रलंबित असलेली विविध कामे मार्गी लावण्यासाठी व नागरिक आणि प्रशासनात समन्वय आ.संदीप क्षीरसागर यांनी गुरुवारी (दि.१०) रोजी तहसीलदार, तहसिल कार्यालयातील सर्व विभागाचे अधिकारी यांची नागरिकांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेतली. यावेळी, प्रलंबित असलेली कामे तातडीने मार्गी लावण्यासाठी व नागरिकांच्या विविध प्रश्नांवर योग्य कार्यवाही करण्यासाठी आ.क्षीरसागर यांनी प्रशासनाला सूचना दिल्यातहसिल कार्यालयाशी संबंधित

पान २ वर

# चार दिवसात आचारसंहिता?, एकाच दिवसात ८० निर्णय

## मंत्री गिरीष महाजन यांचे सुतोवाच; निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर निर्णयांचा धुमधडाका

**मुंबई । पतिनिधी**

**आचारसंहितेपूर्वी महायुती सरकारने निर्णयांचा धडाका लावला आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत महायुती सरकारने तब्बल ८० निर्णय घेतले आहेत. हि शेवटची कॅबिनेट बैठक असण्याची शक्यता असल्याने सरकारतर्फे घाऊक निर्णय घेण्यात आले आहेत. विविध महामंडळे स्थापन करून सर्व समाजघटकांना यातून खूश करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. पत्रकारांसाठीआणि वृतपत्र विक्रेते यांच्यासाठी दोन स्वतंत्र महामंडळांना कॅबिनेटची मंजुरी देण्यात आली आहे. यात एकाच दिवसात तब्बल ८० निर्णय घेतले असल्याने येत्या ३ ते ४ दिवसात राज्यात आचारसंहिता लागू होऊ शकते, असे सुतोवाच मंत्री गिरीष महाजन यांनी दिले आहेत.**



यावेळी मंत्री गिरीष महाजन म्हणाले, आज कॅबिनेट बैठक होती असं वाटत आहे. पुढील ३ ते ४ दिवसांत आचारसंहिता लागेल. शेवटची कॅबिनेट बैठक असल्यानेच आम्ही इतके निर्णय घेतले आहेत. नेहमी असंच होतं. तुम्ही ५०-६० वर्षांचा इतिहास पाहिला तर शेवटच्या मंत्रीमंडळ बैठकामध्ये असे निर्णय घेतले जातात. यात नवीन असे काही नाही, असे महाजन यांनी सांगितले.

राज्य सरकारने निर्णयांचा धडाका लावत नव्याने काही महामंडळ स्थापन करण्यास मंजूरी

पान २ वर

### रतन टाटा यांच्या नावाने उद्योग रत्न पुरस्कार

याशिवाय रतन टाटा यांना मरणोत्तर भारतरत्न देण्यात यावा, असा प्रस्ताव पाठवला आहे, असेही गिरीश महाजन यांनी सांगितले. रतन टाटा यांना जो पहिला उद्योग रत्न पुरस्कार देण्यात आला होता. तो यापुढे रतन टाटा यांच्या नावाने देण्यात येईल, असा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय मुंबई इथे उद्योग भवन उभारले जात असून त्याला रतन टाटा यांचे नाव देण्यात येणार आहे. ठाणे रत्नागिरी आदी कामासाठी सीएसआर मधून ५०० कोटी रुपये रतन टाटा यांनी दिले होते. नवीन उद्योग भवन हे ७०० कोटींचे होत आहे याला नाव देऊन एक प्रकारे शासकीय श्रध्दांजली असेल अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी दिली.

# लोकप्रतिनिधी म्हणून केलेल्या विकासकामांच्या पाठबळावर पुन्हा जनतेसमोर जाणार-सुरेश धस



**आष्टी । प्रतिनिधी**

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये स्वर्गीय लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या निधनाच्या सहानुभूतीच्या लाटेमध्ये अल्पमताने मी पराभूत झालो आणि त्यानंतर २० १९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये मला उमेदवारी मिळाली नसल्यामुळे मी गेली दहा वर्ष आष्टी विधानसभा मतदारसंघाचा आमदार नाही विधान परिषद मतदार संघाचे कार्यक्षेत्र विस्तीर्ण असल्यामुळे विधान परिषद सदस्य या पदावर काम करण्याला मर्यादा येतात दैनंदिन जीवनावश्यक असलेली सर्वसामान्य जनतेची कामे करण्यासाठी अडचणी येतात परंतु माझ्या विधानसभा सदस्याच्या कार्यकाळातील मी केलेली विकास कामे आणि दैनंदिन जनतेच्या सुखदुःखात सामील असल्यामुळे माझ्या या विकास कामांच्या पाठबळावर मी आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये पुन्हा जनतेसमोर जाणार आहे मागील दहा वर्षातील झालेल्या विकास कामांची आणि मी केलेल्या कामांचे जनतेने मूल्यांकन करावे असे

पान २ वर

# बीड विधानसभा मतदारसंघात अडीच हजार घरकुलांना मंजुरी

### डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मानले पालकमंत्री ना.धनंजय मुंडेंचे आभार

**बीड । प्रतिनिधी**



राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून बीड विधानसभा मतदारसंघातील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील नागरिकांसाठी तब्बल अडीच हजार घरकुलांना राज्य शासनाने बुधवारी (दि.९) मंजुरी दिली. पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या आग्रही मागणीमुळे विभागाचे मंत्री ना.अतुल सावे यांनी हा निर्णय घेतला. त्याबद्दल दोघांचेही राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आभार मानले आहेत. य शवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून बीड जिल्ह्यात तब्बल २८ हजार घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. त्यामध्ये बीड विधानसभा मतदारसंघातील बीड तालुक्यातून १५०० तर शिरूर कासार

पान २ वर

### माळ नववी



नवमीचे दिवशी
नवदिवसांचे पारणे हो ।
सप्तशती जप होम हवने
सद्भक्ती करुनी हो
षड्रस अन्ने नैवेद्याशी
अर्पियली भोजनी हो ।
आचार्य ब्राह्मणा तृप्त त्वा केले
कृपे करुनी हो ।।९।।
उदो बोला उदो
अंबाबाई माउलीचा हो ।
उदोकारें गर्जती काय
महिमा वर्णू तिचा हो ।।

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१० ऑक्टोबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २.५० क्विंटल | २,६८१ | २,७०० | २,६९३ |
| ज्वारी/हायब्रिड :७८.०० क्विंटल | २,१४० | २,७०० | २,२६९ |
| मूग : २.५० क्विंटल | ६,४०० | ६,८५१ | ६,६२५ |
| तूर :१.०० क्विंटल | ७,००० | ८,९३० | ७,९६५ |
| उडीद : ७१.५० क्विंटल | ३,६५१ | ७,६०० | ६,६३३ |
| बाजरी : १९.५० क्विंटल | २,०११ | २,६९१ | २,४१० |
| मुग : २८.५० क्विंटल | ६,३०० | ७,२०० | ६,८४३ |
| सोयाबीन: ८०३.५० क्विंटल | ३,००० | ४,५०० | ३,९३० |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ७,५०० | ७,५०० | ७,५०० |

# रतन टाटांना अखेरचा निरोप

### ● शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**मुंबई । प्रतिनिधी**

प्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा यांच्या निधनानंतर राज्यात गुरुवारी एक दिवसांचा दुखवटा पाळण्यात आला. यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषणा केली होती. त्याचबरोबर ज्येष्ठ उद्योगपती पद्मविभूषण रतन टाटा यांना आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत श्रद्धांजली अर्पण करण्यात



आली. रतन टाटा यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांना

पान २ वर

# आ.लक्ष्मण आण्णांच्या नेतृत्वात मतदारसंघाच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध-शिवराज पवार

### शिवराज पवारांच्या हस्ते २५ कोटी रुपये निधीच्या रस्ता कांमाचे उद्घाटन

**गेवराई । प्रतिनिधी**

मतदारसंघातील जनतेने बाळराजे पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी गेवराई मतदारसंघातील रस्त्याच्या माध्यमातून जनतेचा दळणवळणाचा प्रश्न मार्गी लावत मतदारसंघात जलसिंचन व्हावे म्हणून आ.लक्ष्मण पवार



यांनी जलयुक्त शिवार योजनेंतर्गत मतदारसंघात अनेक गावांत असलेल्या नद्यांवर खोलीकरण, रुदीकरण,करत अनेक दर्जेदार सिमेंट बंधारे उभारून अनेक गावांना पाणीदार करण्यासाठीच पारदर्शक काम केले आहे, गेवराई मतदारसंघातील वीज वितरण व्यवस्था सुरळीत करण्यासाठी अनेक ३३ केव्ही केंद्राची उभारून ग्रामीण भागातील अनेक गावांचा अंधार दूर करण्यासाठी प्रमाणिक

पान २ वर

# पंकजा मुंडेंच्या दसरा मेळाव्याला धनंजय मुंडे लावणार हजेरी

## ● बारा वर्षानंतर पहिल्यांदाच दोघे भगवानगडानंतर भगवान भक्ती गडावर एकत्र येणार







**बीड । प्रतिनिधी**

मंत्री धनंजय मुंडे आणि भाजपच्या विधान परिषदेच्या आमदार पंकजा मुंडे तब्बल १२ वर्षांनंतर भगवानभक्ती गडावरील दसरा मेळाव्यात एकत्र येणार आहेत. धनंजय मुंडे यांनी दिवंगत गोपीनाथ मुंडे यांच्याविरोधात भूमिका घेतल्यानंतर मुंडे घराण्यात फुट पडली होती.

पान २ वर

### परळी नगरपालिकेच्या निवडणुकीत धनंजय मुंडेंची पहिल्यांदा विरोधात भूमिका

आधी विधानसभेतून झालेली नाराजी आणि त्यानंतर परळी नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये धनंजय मुंडे यांनी वेगळा गट उभा करून गोपीनाथ मुंडे यांना आव्हान दिले. दसरा मेळावाला गोपीनाथ मुंडे हे भगवानगडावर दरवर्षी जायचे मात्र बंडखोरीनंतर धनंजय मुंडे एकदा भगवानगडावर पोहोचले. मात्र मुंडे समर्थकांनी त्यांना गडावरून हाकलून लावले. आता मात्र पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे हे दोघे बहिण भाऊ एकत्र आल्याने पहिल्यांदाच सावरगाव मधल्या भगवान भक्ती गडावर एकत्रित दसरा मेळाव्याला पाहायला मिळतील.

### मुंडे घराण्यात पहिली ठिणगी कधी पडली?

धनंजय मुंडे यांना २००९ मध्ये विधानसभेची उमेदवारी मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र यावेळी पंकजा मुंडे यांची उमेदवारी गोपीनाथ मुंडे यांनी जाहीर केली आणि इथूनच धनंजय मुंडे यांच्यामध्ये नाराजीला सुरुवात झाली. त्यानंतर नाराज झालेल्या धनंजय मुंडे यांनी शरद पवार यांच्याशी सल्लामसलत केली. २०१२ मध्ये आधी वडील पंडितांना मुंडे आणि त्यानंतर २०१३ मध्ये स्वतः धनंजय मुंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

## अग्रलेख

# जय जय.. पराजय!

हरियाणा आणि जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीचे निकाल मंगळवारी (८ ऑक्टोबर) लागले. यात हरियाणाचे निकाल अनपेक्षित ठरले. भाजपने काँग्रेसला सत्तेपासून दूर ठेवत सलग तिस-यांदा सत्ता आपल्याच ताब्यात ठेवण्याचा चमत्कार करून दाखवला. केंद्र सरकारने लादलेल्या नव्या कृषि कायद्याच्या विरोधात आणि किमान आधारभूत किंमत यासाठी हरियाणातील शेतक-यांनी दीड वर्ष आंदोलन केले होते. शिवाय कुस्तीपटूंचे आंदोलन झाले होते. या दोन्हींचा भाजपला फटका बसून काँग्रेसची सत्ता येईल असे वातावरण होते. मतदानोत्तर चाचण्यातही काँग्रेसला कौल मिळाला होता.

परंतु या आंदोलनाचा कुठलाही प्रभाव मतदारांवर दिसला नाही. उलट भाजपच्या जागा वाढलेल्या दिसल्या. जम्मू-काश्मीरमध्ये मात्र भाजपचा पराभव झाला. म्हणजे त्यांची एका डोळ्यात हासू तर दुस-यात आसू अशी स्थिती झाली. जम्मू-काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्स (एनसी)-काँग्रेस युतीने बाजी मारली. एनसीला ४२ तर काँग्रेसला ६ जागा मिळाल्या. २०१४ मधील निवडणुकीच्या तुलनेत काँग्रेसला यावेळी ६ जागांचे नुकसान झाले. भाजपला ४ जागा अधिक मिळाल्या. यावेळी त्यांना २९ जागा मिळाल्या आहेत. शिवाय त्यांचा स्ट्राईक रेटही चांगला आहे. जम्मू-काश्मीर निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेसने युती केली होती. राहुल गांधी यांचे नेतृत्व हरियाणा आणि जम्मू-काश्मीर या दोन्ही राज्यांत अपयशी ठरल्याचे म्हटले जात आहे. हरियाणा निवडणुकीच्या निकालाचा परिणाम महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकीवर होणार असे भाजपद्वारा मनाचे मांडे रचले जात आहेत.

या निकालाने भाजपाचे मनोधैर्य वाढले असून महाविकास आघाडीला फटका बसेल असा अंदाज व्यक्त केला जात आहे. परंतु मतदारांच्या मनात काय आहे ते कोणीच सांगू शकत नाही. त्यामुळे वेगवेगळे अंदाज व्यक्त केले जातात. जम्मू-काश्मीर निवडणुकीत एनसी-काँग्रेस युतीला ४८ जागा मिळाल्या. २०१४ मध्ये सत्तेत असलेल्या मेहबूबा मुफ्ती यांच्या पीडीपी पक्षाला फक्त ३ जागा मिळाल्या. मेहबूबा यांची कन्या इल्तेजा पराभूत झाली. मोदी सरकारने जम्मू-काश्मीरमधील ३७० कलम हटवल्यानंतरची ही पहिलीच निवडणूक होती. या निर्णयामुळे भाजपला काश्मीर खो-यात एकही जागा जिंकता आली नाही. जम्मूमध्ये अपेक्षित यश मिळाले तरी सत्तेत येता आले नाही. मंगळवारी सकाळी आठ वाजता मतमोजणीला सुरुवात झाल्यावर प्रारंभीच्या कलानुसार हरियाणात काँग्रेस पक्ष आघाडीवर होता, कार्यकर्त्यांनी मिठाई वाटण्यास सुरुवात केली होती.

मात्र, काही मिनिटांतच चित्र पूर्णपणे पालटले. भाजपाने मुसंडी मारल्याचे दिसले आणि दुपारपर्यंत सत्तास्थापनेसाठीचा ४६ हा बहुमताचा जादुई आकडा पार करत तिस-यांदा एकहाती सत्ता मिळवण्याची हॅट्ट्रिक साधली. सैन्य भरतीची अग्निवीर योजना लागू करण्याला झालेला तीव्र विरोध, दिल्लीतील जंतरमंतरवर झालेले कुस्तीपटूंचे आंदोलन आणि सुमारे दीड वर्ष चाललेले शेतकरी आंदोलन यामुळे हरियाणात भाजपविरोधी वातावरण तयार झाले होते. त्याचा भाजपला जोरदार फटका बसेल असे म्हटले जात होते. याचा अंदाज आल्याने भाजपाने हरियाणात नेतृत्व बदल केला. मनोहरलाल खट्टर यांच्याऐवजी नायब सिंह सैनी यांना मुख्यमंत्रिपदी बसवले. हरियाणात शेतकरी आंदोलनामुळे जाट मतदारांच्या नाराजीचा फटका बसणार हे लक्षात आल्याने नायब सिंह सैनी यांना मुख्यमंत्रिपदी बसवून ओबीसी कार्ड खेळण्याची चाल भाजपला यशदायी ठरली. ओबीसी आणि सवर्ण समाजाचा प्रभाव असलेल्या कर्नाल, फरिदाबाद, गुडगाव, भिवानी-महेंद्रगढ आणि कुरुक्षेत्र मतदारसंघात भाजपचे उमेदवार विजयी झाले. प्रचारात ब्रँड मोदींचाही फायदा भाजपला झाला. मोदी-शहा जोडीने हरियाणात १४ जाहीर सभा घेतल्या. मागासवर्गीय समाजाची क्रिमिलेयरची मर्यादा सहा लाखांवरून आठ लाखांवर नेली. राज्य शासनातील इतर मागासवर्गीयांचे गट 'अ' आणि गट 'ब' साठीचे आरक्षण १५ टक्क्यांवरून २७ टक्क्यांपर्यंत वाढवले.

असे काही निर्णय भाजपसाठी फायद्याचे ठरले. काँग्रेसने माजी मुख्यमंत्री भूपिंदरसिंह हुडा यांच्यावर प्रचाराची धुरा सोपवली होती. राहुल गांधी यांनी डझनभर सभा घेत विजय संकल्प यात्रा काढली होती. परंतु काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या कुमारी सेलजा तिकिट वाटपावरून नाराज होत्या. त्यांनी स्वत:ला प्रचारापासून दूर ठेवले होते. म्हणजे प्रमुख नेत्यांमधील अंतर्गत वादाचा फटका काँग्रेसला बसला. भाजपने विजयाचा गुलाल उधळला असला तरी संजय सिंह, कंवरपाल गुर्जर, डॉ. कमाल गुप्ता, रणजित चौटाला, सुभाष सुधा हे मंत्री पराभूत झाले आहेत. हरियाणातील निकालाचे पंतप्रधान मोदी यांनी स्वागत केले आहे. विकासाचे राजकारण आणि उत्तम प्रशासन याचा हा विजय आहे. जनतेच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी पक्ष कोणतीही कसूर ठेवणार नाही असे ते म्हणाले. जम्मू-काश्मीरमधील विजयाबद्दल मोदी यांनी नॅशनल कॉन्फरन्सचे अभिनंदन केले. 'कलम ३७०' रद्द केल्यानंतर जनतेने मोठ्या प्रमाणावर मतदान केले यावरून जनतेचा लोकशाहीवर विश्वास असल्याचे सिद्ध झाले असे ते म्हणाले. हरियाणा विधानसभा निवडणुकीचा निकाल काँग्रेसने अमान्य केला असून त्यामागे कारस्थान असल्याचा आरोप केला आणि लोकशाही प्रक्रियेच्या उपकरणांच्या सत्यतेबाबतचे गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. हरियाणा निवडणुकीचे निकाल हा पारदर्शकता आणि लोकशाही प्रक्रियेचा पराभव आहे, असा आरोप पक्षाचे नेते जयराम रमेश यांनी केला आहे. मतमोजणी प्रक्रिया आणि इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राबाबत १४ मतदारसंघांत त्रुटी होत्या असे ते म्हणाले. हरियाणातील एकही घटक भाजपला अनुकूल नव्हता असे चित्र असतानाही भाजपने तिथे बाजी मारली. जम्मू-काश्मीरच्या निवडणुकीत मात्र भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही. हा त्यांच्यासाठी मोठा धक्का आहे. कलम ३७० रद्द झाल्यानंतर जम्मू-काश्मीर वेगाने विकसित होत असल्याचा भाजपचा दावा फोल ठरला. त्यामुळे हरियाणात भाजपचा जय-जय झाला असला तरी जम्मू-काश्मीरमध्ये त्यांचा पराजय झाला असेच म्हणावे लागेल. या दोन्ही राज्यांच्या निकालावर काँग्रेस पक्षाचे भवितव्य आणि पुढील वाटचाल अवलंबून होती. दोन्ही ठिकाणी काँग्रेसला संमिश्र यश मिळाले आहे.

# गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळांतर्गत अपघातासाठी सानुग्रह अनुदान योजनेचे कवच लागू

## धनंजय मुंडेंची स्वप्नपूर्ती, शासन निर्णय निर्गमित

**मुंबई । प्रतिनिधी**

**सामाजिक न्याय खात्याचे मंत्री असताना धनंजय मुंडे यांनी लावलेल्या रोपट्याला आता फळे येताना दिसत असून नुकत्याच राज्य शासनाने ऊसतोड कामगारांसाठी घोषित केलेल्या अपघात विमा कवचाला सानुग्रह अनुदान योजनेचे मूर्त स्वरूपात प्राप्त झाले असून याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.**

स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून या सानुग्रह अनुदान योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार असून ऊस तोडणीच्या हंगामात कोणत्याही प्रकारच्या अपघातामध्ये ऊसतोड कामगारांचा मृत्यू झाल्यास त्याला पाच लाखांचे कवच या योजनेतून देण्यात येणार आहे, तर कायमचे अपंगत्व आल्यास अडीच लाख रुपयांची मदत दिली जाणार आहे. ऊसतोड कामगारांच्या झोपडी व साहित्याला १० हजारांचे, वैयक्तिक अपघातात उपचारासाठी ५० हजार रुपयांचे, लहान बैलजोडी मृत झाल्यास ७५ हजार रुपयांचे तर मोठी बैलजोडी मृत झाल्यास १ लाख रुपयांचे कवच या सानुग्रह अनुदान योजनेतून लागू करण्यात आले आहे. अत्यंत कमीत कमी कागदपत्रे तसेच जिल्हा स्तरावर मंजुरीचे अधिकार दिल्याने खऱ्या अर्थाने ऊसतोड कामगारांना या योजनेचा अधिक लाभ मिळणार आहे. आजवर ऊसतोड कामगारांची कुठे कागदावर नोंद सुद्धा नसायची, मात्र सध्याचे कृषिमंत्री व तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून स्व.गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाला मूर्त स्वरूप मिळाले. त्याला कायमस्वरूपी निधी मिळण्याचा मार्ग सुकर झाला. महामंडळाच्या माध्यमातुन धनंजय मुंडे यांनी सुरू केलेल्या संत भगवानबाबा शासकीय वस्तीगृह योजनेतून तब्बल ८२ वसतिगृहे सुरू करण्यात आली. ऊसतोड कामगारांची नोंदणी झाली. त्यापाठोपाठ आता अत्यंत जोखमीचे काम करणाऱ्या ऊसतोड कामगार, वाहतूकदार, मुकादम तसेच कामगारांची बैलजोडी ते अगदी झोपडी व त्यातील साहित्याला अपघात व नैसर्गिक आपत्ती अपघाता मुळे होणाऱ्या नुकसानीसाठी सानुग्रह अनुदान योजना लागू केल्याने, धनंजय मुंडे यांनी ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी पाहिलेले आणखी स्वप्न पूर्ण झाले आहे, असे म्हणता येईल. राज्यातील ऊसतोड कामगार, वाहतूकदार, मुकादम, बैलजोडी, झोपडी आदींना सानुग्रह अनुदान योजना लागू केल्याबद्दल धनंजय मुंडे यांनी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

# सिरसाळा बसस्थानक उभारणीचा मार्ग पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केला मोकळा

## कृषी विभागाची जागा बस स्थानकासाठी हस्तांतरित करण्यास कृषी विभागाने दिली परवानगी, शासन निर्णय निर्गमित

**मुंबई । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील सिरसाळा येथे एस टी बसस्थानक उभारणी साठी जागेचा प्रश्न आज पालकमंत्री तथा कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून मार्गी लागला असून, बसस्थानक साठी कृषी विभागाच्या ताब्यात असलेली व सध्या वापरात नसलेली २ एकर जागा महसूल मार्फत राज्य परिवहन महामंडळाला हस्तांतरित करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय आज निर्गमित करण्यात आला आहे.


कृषी विभागाचे सन १९९६ सालचे कृषी तंत्रज्ञान केंद्र या जागेत होते. मात्र त्याचा कालावधी संपून ही जागा सध्या वापरात नव्हती. बस स्थानकास सिरसाळा गाव भागात अन्यत्र जागा उपलब्ध नसल्याने बसस्थानाकाचे का रखडले होते. याचाच विचार करून धनंजय मुंडे यांनी जिल्हा कृषी कार्यालयामार्फत सदर जागेपैकी २ एकर जागा परिवहन विभागास हस्तांतरित करण्याचा परिपूर्ण प्रस्ताव मागवून तो मंजूर केला आहे, त्यामुळे आता सिरसाळा येथे बसस्थानक उभारणीची वाट मोकळी झाली आहे. या जागेत बसस्थानक उभारणीचा प्रस्ताव राज्य परिवहन महामंडळाकडून मंजूर करून याठिकाणी भव्य बसस्थानक उभारणीचे काम लवकरच सुरू केले जाईल, अशी माहिती पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.


# कर्मचाऱ्यांना राज्य सरकार देणार दिवाळी गिफ्ट

## दसऱ्याआधीच निर्णय, ७० लाख सरकारी कर्मचाऱ्यांना मिळणार

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना राज्य सरकार दसऱ्याआधीच मोठे गिफ्ट देणार असून याचा राज्यातील ७० लाख कर्मचाऱ्यांना लाभ होणार आहे.**





लोकसभेच्या पावसाळी सत्रात केंद्रीय अर्थ राज्य मंत्री यांनी ७ व्या वेतन आयोगासंदर्भात महत्वाची माहिती दिली. कोरोना काळातील १८ महिन्यांचा डीए आणि डीआर जारी न करण्याबाबत सध्या सरकार विचार करत नसल्याचे ते म्हणाले. केंद्रीय कर्मचारी आणि पेंशनर्सचे १८ महिन्यांची थकबाकी जारी करण्याचा निर्णय सरकार केव्हा घेणार? असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. त्यावेळी त्यांनी नाही असे उत्तर दिले. सरकारने आर्थिक संकटात असताना देण्यात येणाऱ्या भत्त्यांचे हफ्ते थांबवण्याचा निर्णय घेतला होता. आता सरकारची आर्थिक स्थिती सुधारली आहे. त्यामुळे दिवाळीच्या आधी कर्मचाऱ्यांच्या खात्यात एरियर ट्रान्स्फर केला जाईल, अशी अपेक्षा कर्मचाऱ्यांना होती. पण सरकारकडून यासंदर्भात कोणतीच अधिकृत घोषणा करण्यात आली नाही. पण सरकार लवकरच कर्मचाऱ्यांना दिलासा देऊ शकते, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सरकार १८ महिन्यांचा एरिअर येणाऱ्या महागाई भत्त्यासोबत देण्याची योजना आखत असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. असे झाल्यास सरकारी कर्मचारी आणि पेंशनर्सना मोठा दिलासा मिळू शकतो. जानेवारी २०२०, जुलै २०२० आणि जानेवारी २०२१ हे ३ हफ्ते कोरोना काळात रोखण्यात आले होते. सरकारवरील आर्थिक दबाव कमी व्हावा यासाठी हा निर्णय घेण्यात आला होता.सरकारकडून दिवाळीच्या आधी कर्मचाऱ्यांच्या खात्यात महागाई भत्त्यासोबत राहिलेली रक्कम दिली जाऊ शकते. या योजनेनुसार झाल्यास महागाई भत्ता वाढण्यासोबत राहिलेली शिल्लकदेखील कर्मचाऱ्यांना मिळू शकते. त्यामुळे दसऱ्याआधीच राज्य सरकार हे कर्मचाऱ्यांना मोठे गिफ्ट देण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे. तसे झाले तर ७० लाख कर्मचाऱ्यांना त्याचा लाभ मिळणार आहे.

### कर्मचाऱ्यांसाठी दिवाळीत आनंदाची बातमी

सरकारकडून लवकरच डीएमध्ये वाढीची घोषणा केली जाऊ शकते तसेच १८ महिन्याची शिल्लकदेखील दिली जाऊ शकते. यामुळे केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या खात्यात पगाराव्यतिरिक्त एक मोठी रक्कम जमा होऊ शकते. सणासुदीच्या काळात त्यांची आर्थिक स्थिती सुधारु शकते. सुत्रांनी याबद्दल माहिती दिली आहे. या वृत्ताला अद्याप अधिकृत दुजोरा देण्यात आला नाही.

### वर्षातून दोनदा डीएमध्ये वाढ

७ व्या वेतन आयोगानुसार महागाई भत्त्यात वर्षातून दोनवेळा वाढ केली जाऊ शकते. ऑक्टोबरचा शेवटचा आठवडा किंवा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात महागाई भत्त्यात वाढ केल्याची घोषणा केली जाऊ शकते. या वाढीमुळे लाखो केंद्रीय कर्मचारी आणि पेंशनर्सना दिलासा मिळणार आहे. प्रत्येकवर्षी महागाईच्या हिशोबाने या भत्त्यांमध्ये वाढ केली जाते. ज्यामुळे कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारते.

## पान १वरून...

### नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या

जिल्हास्तरीय समिती आणि तालुकास्तरीय समिती गठित करण्यात येतील. पिकांच्या माहिती संचासाठी तिन्ही हंगामात मिळून सुमारे ८१ कोटी ८३ लाख रुपये खर्च दरवर्षी येईल. हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथील बाळासाहेब ठाकरे हळद (हरिद्रा) संशोधन व प्रशिक्षण केंद्रासाठी ७०९ कोटी २७ लाख रुपयांचा अतिरिक्त निधी मंजूर करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. याकेंद्रासाठी मंजूर अतिरीक्त निधी टप्पेनिहाय वितरीत करण्यात येणार आहे. हळदीवरील संशोधनासाठी तसेच निर्यातक्षम उत्पादन बनवण्यासाठी हे केंद्र स्थापन करण्यात आले आहे. राज्यातील चारही कृषि विद्यापीठांच्या प्रकल्पग्रस्तांमधून क आणि ड संवर्गातील पद भरतीसाठी विशेष बाब म्हणून निर्बंध शिथील करून मान्यता देण्याचा निर्णय सुद्धा आज झाला. ५० टक्के पदे ही त्याच विद्यापीठांच्या बाधित प्रकल्पग्रस्तांकरिता राखीव ठेवण्यात येतील. चारही कृषि विद्यापीठांत ३ हजार २३२ हेक्टर जमीन अधिग्रहीत करण्यात आली असून, यामुळे बाधित झालेल्या कुंटुंबातील पात्र उमेदवाची यात भरती करण्यात येईल. ही विशेष भरती प्रक्रीया राबविताना सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिकेचा निर्णय, समांतर आरक्षण व सामाजिक आरक्षण याची सांगड घालण्यात येईल, अशी माहिती कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

-------------

### चार दिवसात आचारसंहिता?,

देण्यात आली आहे. यात संत गोरोबा कुंभार महामंडळ, कोळी समाज महामंडळसाठी प्रस्ताव मागवण्यात आला आहे. मंत्री गुलाबराव पाटील यांनी ही माहिती दिलीय. याशिवाय आजच्या बैठकीत लेवा पाटील समाज महामंडळाला मंजूरी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नॉन क्रिमीलयेर संदर्भातील प्रस्ताव केंद्राकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे. ओबीसी नॉन क्रिमीलेअरच्या उत्पन्नचा टप्पा ८ लाखाहून १५ लाखापर्यंत नेण्याचा या प्रस्तावात नमुद करण्यात आले आहे. धनगर समाज संदर्भातील शुद्धीपत्रक रद्द करण्यात आले आहे. धनगर ऐवजी धनगड असं वाचावे असं शुद्धीपत्रक काढण्यात आले होते. धनगर समाजाने या शुद्धीपत्रकावर आक्षेप घेतला होता.

आजच्या मंत्रिमंडळ बैठखीत आर्थिक विकास महामंडळाचा निर्णयही घेण्यात आला आहे. गुजर समाज, लेवा पाटील समाजात मोठ्या प्रमाणात गरीबी आहे. त्यांना मदत करण्यासाठी महामंडळाचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मंत्री गिरीश महाजन यांनी दिली आहे.

-----------

### आ.क्षीरसागरांनी घेतली तहसिल

अनेक कामे प्रलंबित असून कामे होण्यास अडचणी येत असल्याचे मतदारसंघातील नागरिकांनी आ.संदीप क्षीरसागर यांना कळवले. यावर आ.क्षीरसागर यांनी गुरुवारी (दि.१०) रोजी शासकीय विश्रामगृह, बीड येथे तहसिलदार, तहसिल कार्यालयातील सर्व विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांची आढावा बैठक घेतली. तहसील कार्यालयाच्या अंतर्गत असणाऱ्या श्रावणबाळ योजना, संजय गांधी निराधार योजना, जन्म मृत्यू प्रमाणपत्र, उत्पन्नाचे दाखले, विविध प्रकारचे अनुदान, पिक विमा, तलाठी व मंडळ अधिकारी यांच्याकडे शेतकऱ्यांशी संबंधित विषय, विद्यार्थ्यांना लागणारे विविध प्रमाणपत्र, विविध समाजाच्या जातीचे प्रमाणपत्र व इतर आवश्यक असलेल्या बाबींच्या संदर्भाने नागरिकांना होत असलेल्या अडचणी व दिरंगाई बाबत संबंधित नागरिकांच्या समोरच उपस्थित अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना दिल्या. जनसामान्यांना प्रशासनाच्या वतीने योग्य सेवा मिळणे आवश्यक आहे. तसेच ज्येष्ठ नागरिक, शेतकरी विद्यार्थी महिला भगिनी आत्महत्याग्रस्त कुटुंबीय रेशनधारक यांची प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावा असेही आ.क्षीरसागर यांनी अधिकार्यांना सांगितले. नागरिकांना योग्य सेवा मिळेल यासाठी मी कायमच प्रयत्नशील असतो, प्रशासनाशी योग्य समन्वय ठेवून पुढील काळात नागरिकांना अधिक चांगल्या पद्धतीने सेवा मिळेल याची दक्षता घेणार असल्याचेही आ.क्षीरसागरांनी म्हटले आहे.

------------

### बीड विधानसभा मतदारसंघात

तालुक्यातून १००० हून अधिक अशा एकूण २ हजार ५०० घरकुलांचा समावेश आहे. या सर्व लाभार्थ्यांना योजनेतून स्वतःचे पक्के घर बांधण्यासाठी प्रत्येकी १ लाख २० हजार रुपये निधी मिळणार आहे. यापूर्वी पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, मतदारसंघातील अनेक सरपंचांनी हजारो घरकुलाचे प्रस्ताव पंचायत समितीमार्फत दाखल केले होते. त्यातून जिल्हास्तरीय समितीने पात्र प्रस्ताव शासनाकडे पाठविले. परंतु अनेक महिन्यांपासून मंजुरीसाठी प्रलंबित असल्याने सरपंचांकडून सातत्याने मंजुरीची मागणी होत होती. या मागणीची दखल घेऊन पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री ना.अतुल सावे यांनी रेकॉर्डब्रेक २८ हजार घरकुलांना मंजुरी दिली. यात बीड विधानसभा मतदारसंघातील तब्बल अडीच हजार घरकुलांचा प्रश्न मार्गी लागल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

**पालकमंत्र्यांना भेटून सरपंच आभार मानणार**

बीड विधानसभा मतदारसंघातील अनेक गावातून घरकुलांचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित होते. परंतु अनेक हेलपाटे मारून मंजुरी मिळत नव्हती. अखेर पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी घरकुलांचा प्रश्न मार्गी लावला असून डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली अनेक सरपंच हे ना.मुंडे यांची भेट घेऊन आभार मानणार असल्याचे सांगितले आहे.

----------

### लोकप्रतिनिधी म्हणून केलेल्या विकासकामांच्या

प्रतिपादन माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी केले मातकुळी येथील मातकुळी ते कर्हेवडगाव या ४ कोटी ५६ लक्ष रुपये किमतीच्या कामाच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर जिल्हा परिषद सदस्य अमर राजे निंबाळकर नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये कांदा निर्यात संबंधीचा चुकीचा निर्णय चांगलाच नडल्याने महाराष्ट्रातील आठ ते दहा लोकसभेच्या जागा गमवाव्या लागल्या विरोधकांच्या फेक नरेटीव्ह मुळे जनतेमध्ये संभ्रम पसरला आणि भारतीय जनता पार्टीचे आणि मित्र पक्षांचे नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. आता केंद्र शासनाने निर्यात बंदीचे धोरण बदलले असून शेतकरी हिताचे निर्णय घेण्यात आले असून कांद्यावरील निर्यात बंदी उठवल्यामुळे कांदा उत्पादकांना चांगला भाव मिळत आहे तसेच शेतमालाला हमीभावामध्ये चांगली वाढ दिल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळत आहे मात्र केंद्र शासनाचे आणि राज्य शासनाच्या चांगल्या कामांची चर्चा ग्रामीण भागामध्ये होत नाही खासगी मध्ये मात्र चांगलं चाललंय असं म्हणतात राज्य शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेमुळे ग्रामीण भागातील महिला अत्यंत समाधानी असून संसारासाठी धडपडणाऱ्या महिलांना मिळणाऱ्या या अर्थसहाय्यामुळे चांगली मदत होणार आहे तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पीएम किसान सन्मान योजनेतील सहा हजार आणि राज्य सरकारचे सहा हजार असे बारा हजार रुपये शेतकऱ्यांना मिळत आहेत शेतकऱ्यांबाबत यापूर्वीच्या कोणत्याही सरकारमध्ये अशा प्रकारचे अर्थसहाय्य मिळालेले नाही तसेच एक रुपयांमध्ये पीक विमा देखील कोणत्याही सरकारने यापूर्वी काढलेला नाही महाराष्ट्र शासनाने मोफत वीज बिल आणि सौर योजना कार्यान्वित केली आहे या सर्व अतिशय चांगल्या बाबींची चर्चा ग्रामीण भागामध्ये होत नाही त्यामध्ये आपण कुठे कमी पडतो आहोत याचा विचार ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांनी केला पाहिजे आणि विरोधकांना ठोस उत्तर दिले पाहिजे असे सांगत ते पुढे म्हणाले की, महाविकास आघाडीच्या कार्यकाळामध्ये कोविडच्या नावाखाली सर्व यंत्रणा ठप्प होत्या त्या काळात कोणताही विकास झालेला नाही आणि त्या सरकारने काहीही जनतेसाठी केलेले नाही १९९९ ते २०१४ या कालावधीमध्ये मी आणि आमच्या कुटुंबीयांनी आष्टी विधानसभा मतदारसंघातील केलेली जनतेची सेवा जनतेने पाहिलेली आहे मतदारसंघातील रस्ता कामे, वीज उपकेंद्रे निर्मिती, शाळा खोल्यांची बांधकामे, जलजीवन योजनेअंतर्गत गावोगावी पिण्याच्या पाण्याचे योजना कार्यान्वित केल्यामुळे या विकास कामांच्या जोरावरच आपण आजही जनतेमध्ये आहोत आणि दैनंदिन सुखदुःखात सामील होत आहोत . मागील दहा वर्षातील विधानसभा सदस्य हे जनतेच्या सुखदुःखात सामील होत नाहीत आता विधानसभा निवडणूक आल्यामुळे त्यांनी आपले दौरे सुरू केले असून विकास कामे केले असल्याचे ते सांगत आहेत कोविड काळामध्ये आपण आणि आमचे कुटुंबीय रात्रंदिवस जनतेच्या आरोग्यासाठी कार्यरत होतो याचा जनतेला विसर पडणार नाही .गेली दहा वर्षे आपण विधानसभा सदस्य नाहीत मध्यंतरी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री पंकजाताई साहेब मुंडे यांनी माझ्यावर जबाबदारी टाकून मला विधान परिषदेची उमेदवारी देऊन निवडून आणले विधानसभा सदस्य आणि विधानपरिषद यामध्ये विकास कामांसाठी निधीची कमतरता जाणवते कारण एक विधानसभा मतदारसंघ आणि तीन जिल्हयातील गावांमध्ये करावी लागणारी विकास कामे यामध्ये फार मोठा फरक आहे त्यामुळे आष्टी विधानसभा मतदारसंघाचा मी आमदार नव्हतो तरीही सर्वसामान्य गोरगरीब जनतेला मी त्याची जाणीव न होऊ देता २४तास लोकांचे सेवेत काम करत असल्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये जनतेने मागील दहा वर्षाच्या काळात झालेली कामे आणि मी विधानसभा सदस्य आणि विधान परिषद सदस्य असताना आष्टी विधानसभा मतदारसंघातील केलेल्या कामांचे मूल्यमापन जनतेने करावे आणि जनतेनेच ठरवावे आज केवळ विकासकामांच्या भूमिपूजनासाठी आलो आहे आपण सर्व मूल्यांकन करून जनता जनार्दनाचा पुन्हा एकदा आशीर्वाद घेण्यासाठी आपण येणार आहोत असे त्यांनी शेवटी सांगितले

--------------

### आ.लक्ष्मण आण्णांच्या नेतृत्वात मतदारसंघाच्या

प्रयत्न केले आहे . मतदारसंघात आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रयत्नातून मतदारसंघाच्या सर्वागीण विकासासाठी आ.लक्ष्मण पवार यांनी मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणुन मोठ्या प्रमाणात विकास कामे सध्या मतदारसंघात सुरुच आहे आण्णांनच्या नेतृत्वाखालील मतदारसंघातील सर्वागिण विकासाठी आम्ही कटिबद्ध .त्या अनुषंगानेच मतदारसंघातील माजलगाव तालुक्यातील राममा ६१ ते हारकी निमगाव,रामपिंपळगाव,मगरुळ २, ६ की.मी. किंमत ६ कोटी,तालखेड फाटा ते तालखेड रस्ता ५ की.मी.किमंत ५ कोटी,माजलगाव रोड ते जाभंळी तांडा,४.५०० कि.मी. किंमत २ कोटी लक्ष, मतदारसंघातील बीड तालुक्यातील पेडगाव फाटा ते कांबी, सौदाना रस्ता,९.७५० क.मी.किंमत ७ कोटी २७ लक्ष गेवराई तालुक्यातील भेड खु.ते.भेड बु.रस्ता ४ की.मी.किंमत ३ कोटी,केकत पागंरी ते हारीलाल नाईक तांडा, ३ कि.मी.२ कोटी रुपयाचे आज दि.१० ऑक्टोबर रोजी युवानेते शिवराज पवार यांच्या हास्ते शुभारंभ संपन्न झाला. यावेळी अभियंता कुलकर्णी, तालुका प्रमुख शिनुभाऊ बेद्रे,शरद कचरे,वैभव मोरे,अभिजीत मोरे,संतोष जाधव, कृष्णा उडे,विठ्ठल मोरे,अभिजीत जाधव,संतोष गायकवाड, भरत गायकवाड, किशोर धोडलकर, समाधान मस्के,करण जाधव, गोरख मोटे,कृष्णा पाटोळे,बाबा वाघमारे,गणेश पवार, भाग्योदय पटेकर,दिपक शेलार,बाबु खराडे,रवि जगले,रंगनाथ कोळपे,मधुकर सौळुके,राजाभाऊ शिदे,किसान वाव्हळ, पप्पु पांचाळ,गुत्तेदार दागंट,मनोज फाटक,सुनिल कराडे,शुभम माऊली आदी उपस्थित होते,

---------

### रतन टाटांना अखेरचा निरोप

अखेरचा निरोप देण्यात आला. उद्यमशीलता हादेखील समाज उभारणीचा प्रभावी मार्ग असतो. नवनवीन उद्योगांच्या उभारणीनेच देश प्रगतीपथावर नेता येतो, मात्र त्यासाठी हृदयात निस्सीम देशप्रेम आणि आपल्या समाजाप्रती तितकाच प्रामाणिक कळवळा हवा. रतन टाटा यांच्या रुपाने आपण अशाच विचारांचा एक समाजसेवी, द्रष्टा आणि देशप्रेमी मार्गदर्शक गमावला. भारताच्या उद्योगक्षेत्रातच नव्हे, तर समाजउभारणीच्या कामातही श्री. टाटा यांचे योगदान अपूर्व होते. ते महाराष्ट्राचे सुपुत्र होते. भारताचा अभिमान होते. स्वयंशिस्त, स्वच्छ कारभार आणि मोठमोठे उद्योग सांभाळताना पाळलेली उच्च प्रतीची नैतिक मूल्ये या कठोर कसोट्या पार पाडत श्री. टाटा यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर आपला आणि भारताचाही ठसा उमटवला. त्यांच्या रुपाने देशाचा एक प्रमुख आधारस्तंभ कोसळला आहे. त्यांना गुरुवारी अखेरचा निरोप देण्यात आला. शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने नागरीक उपस्थित होते.

**भारतरत्न देण्यासाठी केंद्राकडे राज्य शिफारस करणार**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबतचा शोकप्रस्ताव बैठकीत मांडला. यावेळी रतन टाटा यांचे कार्यकर्तृत्व लक्षात घेऊन त्यांना भारतरत्न देण्याची केंद्राला विनंती करणारा प्रस्तावही संमत करण्यात आला आहे.

-------------

### पंकजा मुंडेंच्या दसरा मेळाव्याला

त्यानंतर गोपीनाथ मुंडेंचं २०१४ साली गोपीनाथ मुंडे यांचं निधन झालं. त्यानंतर पंकजा मुंडे यांच्या उपस्थित हा दसरा मेळवा पार पडत होता. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी २०२३ मध्ये महायुतीत येण्याचा निर्णय घेतला. तेव्हापासून पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे पुन्हा एकत्रित आलेले पाहायला मिळाले आहेत.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि.११ ऑक्टोबर २०२४


## माध्यमिक विद्यालयाची मतदान जनजागृतीपर रॅली

दिंद्रुड / प्रतिनिधी :- येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या औचित्याने दिंद्रुड येथील सिंदफणा माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती पर रॅलीचे आयोजन बुधवारी केले होते. विद्यार्थ्यांनी नाटिकेद्वारे गावकऱ्यांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित केले.



विधानसभा निवडणुकीचे आगामी काळात मतदान आहे. कुठल्याही प्रलोभनाला बळी न पडता योग्य त्या उमेदवारांना मतदान करण्यासाठी त्याचप्रमाणे योग्य उमेदवार उभा न ठाकल्यास नोटाला मतदान करण्यासाठी, मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य बजावण्यासाठी माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी बुधवारी सकाळी गावातून प्रभात फेरी काढली होती. याप्रसंगी उच्च माध्यमिक च्या इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी त्याचप्रमाणे चुकीच्या प्रचाराला बळी न पडता योग्य त्या उमेदवारांना मतदान करण्यासाठी नाटिकेचे आयोजन केले होते. ग्रामस्थांनी या नाटिकेला गर्दी केल्याचे पाहायला मिळाले. आपली जबाबदारी व अधिकार हा मजबूत लोकशाहीचा अधिकार, लोकशाहीने दिलेल्या राष्ट्रीय अधिकाराला बजावताना सर्वांनी पुढे आले पाहिजे हा संदेश ग्रामस्थांना दिला. या नाटिकेच्या आयोजन सह शिक्षक ज्ञानोबा कटारे,व्ही.एस.बोचरे,एस.पी.कोटुळे,शंकर वाघमारे,एन.जी.सोनवणे,एन.यू.कदम,श्रीमती ए.ई.पवार,एम.आर.पवार च्या शिक्षक वृंदांनी केले होते.

# अंबाजोगाईत उद्या धम्म महोत्सवाचे आयोजन

## भदन्त पय्यातिस्स, खा.डॉ.फौजिया खान यांची विशेष उपस्थिती

अंबाजोगाई प्रतिनिधी

बुद्धिस्ट फाऊंडेशन ऑफ इंडिया यांच्या वतीने शनिवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०२४ रोजी नियोजित विश्वशांती महाविहार, लुंबिनी पार्क, मांडवा रोड, अंबाजोगाई (जि.बीड) येथे भव्य धम्म महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाचे हे ४ थे वर्ष आहे. या महोत्सवात आदरणीय भदन्त पय्यातिस्स (सिरसाळा) यांची धम्मदेसना - धम्मप्रवचन होणार आहे. तर उद्घाटक म्हणून खा.डॉ.फौजिया खान (सदस्य, राज्यसभा, नवी दिल्ली.) आणि समारोप सत्रात सौ.नमितताई अक्षय मुंदडा (आमदार, केज विधानसभा) यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. धम्म महोत्सव धम्म ध्वजारोहण, उद्घाटन, बुध्द मूर्तीची प्रतिष्ठापना, धम्म प्रवचन, सभागृहाचे लोकार्पण, पुरस्कार वितरण, गुणवंत विद्यार्थी सत्कार आणि बुद्ध भिमगीतांचा कार्यक्रम व मानवतावादी काव्य वाचन आणि समारोप अशा चार सत्रात होणार आहे. दरवर्षी धम्म उपासकांच्या योगदानातून अशोक विजयादशमी दिवशी म्हणजे धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाचे औचित्य साधून ''भव्य धम्म महोत्सव'' घेण्याचे बौध्द उपासकांनी सर्वानुमते ठरवले आहे. महोत्सवात धम्म प्रेमी जनता व बौध्द उपासकांनी सहभागी होण्याचे आवाहन व्यवस्थापन समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

शनिवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत (चार सत्रांमध्ये) नियोजित विश्वशांती महाविहार, लुंबिनी पार्क, मांडवा रोड, अंबाजोगाई (जि.बीड) येथे हा महोत्सव होईल. शनिवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० ते ११.३० या वेळेत पहिल्या सत्रात प्रसिद्ध गायक प्रा.शिवाजी कांबळे (परभणी) यांचा बुध्द भिमगितांचा प्रबोधनपर कार्यक्रम होईल. त्यानंतर सत्र दुसरे हे उद्घाटनाचे असेल सकाळी ११.३० ते दुपारी १.३० वाजता या वेळेत ध्वजारोहण, सभागृहाचे लोकार्पण, बुध्दमूर्ती प्रतिष्ठापना आणि शाम लक्ष्मण सरवदे (उत्कृष्ट समाजसेवक), संतोष राजाराम बनसोडे (उत्कृष्ट उद्योजक), अनिल शेषेराव बनसोडे (उत्कृष्ट उद्योजक), राजेंद्र राधाकिसन घोडके (धम्म मित्र), डी.एस.नरसिंगे (धम्म मित्र), प्राचार्य डॉ.जयपाल प्रभाकर कांबळे (उत्कृष्ट




प्रशासन अधिकारी) या मान्यवरांना पुरस्कार वितरण करण्यात येईल. यावेळी खा.डॉ.फौजिया खान (सदस्य, राज्यसभा, नवी दिल्ली.) यांचे हस्ते धम्म महोत्सवाचे उद्घाटन होईल. तर उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा हे असतील. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, नगराध्यक्षा सितातार्इ बनसोड (केज नगरपंचायत), डॉ.नरेंद्र काळे (प्रदेश उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार.), ॲड.अनंतराव जगतकर (अध्यक्ष, ज्येष्ठ नागरिक संघ, अंबाजोगाई.), सामाजिक कार्यकर्त्या डॉ.अंजलीताई घाडगे, प्रा.एस.के.जोगदंड (ज्येष्ठ नेते, अंबाजोगाई.), भाऊसाहेब राठोड (सरपंच, काळवटी तांडा), चंद्रशेखर वडमारे (उद्योजक, अंबाजोगाई) या मान्यवरांची विचारमंचावर प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. धम्म महोत्सवाचे तिसरे सत्र हे धम्म प्रवचनाचे आहे, हे सत्र दुपारी २ ते ४ या वेळेत होईल. यावेळेस आदरणीय भदन्त पय्यातिस्स (सिरसाळा) हे धम्म देसना देतील. आणि प्रमुख वक्ते दंगलकार नितिन चंदनशिवे (महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी व लेखक) यांच्या मानवतावादी कवितांचे वाचन होईल. या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.सुरेश शेळके (फुले, शाहु, आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक, परभणी.) हे असतील. चौथे सत्र म्हणजे धम्म महोत्सवाचा समारोप होय, हे सत्र दुपारी ४ वाजता सुरू होईल. समारोप सत्रास प्रमुख मार्गदर्शक म्हणून आमदार सौ.नमितताई मुंदडा (केज विधानसभा मतदारसंघ.) तर समारोप सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा.डी.जी.धाकडे (अध्यक्ष, बुद्धिस्ट फाऊंडेशन ऑफ इंडिया) हे असतील. समारोप सत्रात शैलेश कांबळे (जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी, बीड.), डॉ.सिध्दार्थ टाकणखार (प्रदेश सचिव, ब.स.पा), महादु मस्के (माजी नगराध्यक्ष, अंबाजोगाई), दशरथ सोनवणे (तालुकाध्यक्ष, रिपाइं (ए), अंबाजोगाई ), महादेव आदमाने (माजी नगरसेवक, अंबाजोगाई), इंजि.प्रभाकर कांबळे (सेवानिवृत्त अभियंता), ॲड.माणिक आदमाने (राज्य सचिव, बी.आर.एस.पी.), आर.डी.जोगदंड (मास्टर ट्रेनर), शेख रहीम (माजी उपनगराध्यक्ष, अंबाजोगाई) या मान्यवरांची विचारमंचावर प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने होईल. अंबाजोगाई बस स्थानक ते धम्म महोत्सवाच्या नियोजित ठिकाणी जाण्यासाठी सकाळी १० ते ११.३० आणि सायंकाळी ५.३० ते ७.३० या वेळेत एस.टी.बसची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. तरी महोत्सवात धम्म प्रेमी जनता आणि बौध्द उपासकांनी सहभागी होण्याचे आवाहन प्रमुख संयोजक प्रा.डी.जी.धाकडे, प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे, ॲड.सुनिल सौंदरमल, कबिरानंद कांबळे, डॉ.शंकर वाघमारे, उत्तम डोंगरे, राजेंद्र घोडके, प्रा.शिवाजीराव मांदळे, डॉ.सर्जेराव काशिद, अशोक भोजने, इंजि.विजयानंद बलाढ्ये, डॉ.गुलाबराव सिरसट यांच्या वतीने करण्यात येत आहे. तर धम्म महोत्सवाच्या यशस्वितेसाठी व्यवस्थापन समितीचे डॉ.राहुल धाकडे, डॉ.संतोष बोबडे यांच्यासह सर्व [illegible]

## मेहबूब शेख यांनी आष्टी पाटोदा मतदारसंघातील पुणे मतदाराची घेतली सदिच्छा भेट

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब भाई शेख यांनी आष्टी पाटोदा शिरूर कासार मतदारसंघातील पुणे येथील रहिवासी असणाऱ्या मतदारसंघाची घरी जाऊन सदिच्छा भेट घेतली आहे नरे आंबेगाव धायरी भारतीय विद्यापीठ परिसरात नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने आष्टी पाटोदा व शिरूर कासार मतदारसंघातील खूप मोठ्या प्रमाणात मतदार हा पुणे जिल्ह्यात आहे त्यातील अनेक ठिकाणी त्यांच्या घरी जाऊन त्याचे भावी आमदार महबूब भाई शेख यांनी नोकरी बद्दल व व्यवसाय बद्दल विचारपूस केली व अनेक नागरिकांबरोबर संवाद



साधला अनेक विषयावर चर्चा करण्यात आली यावेळी उपस्थित महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी युवक काँग्रेस उपाध्यक्ष मा कुशल करंजवणे श्री संतोष दादा पवार संघटक राष्ट्रवादी काँग्रेस खडकवासला विधानसभा मतदारसंघ पुणे. प्रदेश कार्यकारणी सदस्य अँड अशोक बेंद्रे अँड किरण कोल्हे मतदारसंघातील बाळाभाऊ कवडे हडपसर विधानसभा अध्यक्ष राष्ट्रवादी शरद पवार गट महादेव दादा पवार फुलचंद्र दादा भोसले राम शिंदे अमोल वाघ युवा नेते शौकत शेख पत्रकार किरण डावकर देवानंद शेंडगे मतदारसंघातील अनेक मान्यवर व पुणे येथील सर्वच पदाधिकारी उपस्थित होते

## खोलेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचे जिल्हास्तरीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेत घवघवीत यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दि. ०९ ऑक्टोबर २०२४ रोजी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड यांच्या वतीने येथील खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई येथे १४ वर्षाखालील, १७ वर्षाखालील व १९ वर्षांखालील मुले व मुलींच्या जिल्हास्तरीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते .या स्पर्धेत खोलेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक प्राप्त करून या क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश प्राप्त केले.

तसेच दि. १४ ऑक्टोबर २०२४ रोजी वसमत, जि. परभणी येथे होणाऱ्या विभागीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेसाठी हा संघ पात्र ठरला आहे. या संघात कु. भक्ती तपसे, कु. विद्या शेळके, कु. कृतिका कदम ,कु.आकांक्षा नरवटे. कु.प्राजक्ता धर्माधिकारी, कु. अंजली



शेळके , कु.प्रीती गंगणे, कु. अनुष्का दोनगहू , कु. निशा कोळी, कु. प्रांजली सोमवंशी इ. विद्यार्थीनींचा सहभाग होता.या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक प्रा.डॉ. माणिक पोखरकर ,प्रा.राहुल चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.या सर्व विजयी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या क्रीडा मार्गदर्शकांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र अलुरकर ,कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा खोलेश्वर महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष राम कुलकर्णी, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी , वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. बिभीषण फड ,डॉ. दीपक फुलारी, व्यवसाय शिक्षण विभागाचे उपप्राचार्य डॉ.रवींद्र कुंबेफळकर ,कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य आनंद पाठक ,पर्यवेक्षक व सर्व प्राध्यापक यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## बारा ऑक्टोबरला नारायण गडावर करोडोंच्या संख्येने उपस्थित रहावे -गलांडे

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील व महाराष्ट्रातील मराठा बांधवांना त्यांच्या चरणी नतमस्तक होऊन मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार कुनबी १२ ऑक्टोंबर नारायण गड येथे संघर्ष योद्धा आदरणीय जरांगे दादा पाटील यांनी घोषित केलेला दसरा मेळावा त्या मेळाव्यासाठी मी एक सेवक म्हणून दसऱ्या मेळाव्याची ला १८ पकड जाती जमातीतील मित्र कंपनीने आणि मराठा बांधवांनी यावे, म्हणून कॉर्नर बैठका घेत असल्यामुळे ,पण त्याही बैठक्या भारतावर इंग्रजांचे राज्य असताना स्वातंत्र्य मिळवण्यासाठी स्वातंत्र्य सेनानी गोपनीय बैठका घेत होते ,आज घडीला केज मतदार संघात, अघोषित हुकूमशाही चालू आहे ,त्यामुळे मीही गोपनीय बैठका



घेतल्या आणि आता तर ओपन बैठका घेणार असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे. समाजासाठी मेलो तरी चालेल याची परवा नाही, मराठा मरेगा पर डरेगा नहीं आमदार नमिता मुंदडा चे लाभधारक धमक्या देत आहे कारण की आमदार नमिता मुंदडा हे ओबीसी नाहीत मराठा नाहीत त्यांचे प्रति व सासरे हे प्रप्रांती आहे त्यामुळे त्यांच्या पोटात कळ फार मोठ्या प्रमाणात निघत आहे पन त्यांच काही असो पन मेलो तरी मराठा समाजासाठी मरेल व तरी येणाऱ्या १२ तारखेला दसरा मेळावा निमीत्त नारायणन गडावर करोडोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी केले आहे.

## खांडेपारगावचे माजी सरपंच अशोक आमटेंचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

बीड । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात इनकमिंग सुरूच आहे. बीड तालुक्यातील खांडेपारगावचे माजी सरपंच अशोक आमटे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. हा प्रवेश सोहळा खांडेपारगाव येथे पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी (दि.९) उत्साहात पार पडला. ग्रामस्थांच्यावतीने डॉक्टर दाम्पत्याचे फुलांची उधळण करत हलगीच्या तालावर जल्लोषात स्वागत करण्यात आले.

डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून बीड विधानसभा मतदारसंघातील



दररोज प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते पक्षात प्रवेश करून खंबीर साथ देत आहेत. माजी सरपंच अशोक आमटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजित पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या विचाराने प्रेरित होवून डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांसमवेत पक्षात प्रवेश केला. यावेळी त्यांचा सत्कार करून डॉक्टर दाम्पत्याने स्वागत केले. यावेळी सरपंच ॲड.राजेंद्र राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस ग्रंथपाल जिल्हाध्यक्ष भागवत आमटे, हनुमंत बोरगे, गोविंद खुरणे, पं.स.चे माजी सभापती सखाराम ठोकळ, सरपंच रामेश्वर आनेराव, हरिभाऊ आमटे, नवनाथ सपकाळ, माणिकभाऊ आमटे, मधुकर वाघमारे, राहुल साळुंके, ईश्वर धनवे, माजी सरपंच मसुराम साळुंके, नागापूर खु.चे सरपंच किशोर ढोकणे, मा.सरपंच तुकाराम जाधव, वसंत शिंदे, धर्मराज सोळूंके, अर्जुन अवघड, बाळू आमटे, मिलिंद ठोकळ, रमेश आमटे, धीरज कदम, जगदीश सपकाळ, अशोक वाघमारे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डॉ.योगेश क्षीरसागरांसारख्या नेतृत्वाची मतदार संघाला गरज-आमटे

गेल्या दोन वर्षापासून आपण डॉ.योगेश क्षीरसागर व डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांचे राजकीय, सामाजिक कार्य पाहत आलो आहे. मतदारसंघाला विकासाच्या वाटेवर नेण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आहे. त्यांच्यासारख्या नेतृत्वाची बीड मतदारसंघाला गरज असून आगामी विधानसभा निवडणुकीत आपण त्यांच्या मागे ताकद उभी करणार असल्याचे माजी सरपंच अशोक आमटे यांनी म्हटले आहे.

### जाहीरनामा

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत**

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी सुधारणा कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये

सर्व जनतेस मौजे पिंपरखेड ता. आष्टी यांना जाहीर केले जाते कि अर्जदार श्री. ऋषिकेश डीगु भौसले रा. पिंपरखेड ता. आष्टी जि.बीड यांनी त्याच मुलगा नाम श्रीकेश ऋषिकेश भोसले याचा जन्म दि. ०५/११/२०१९ रोजी भीजे पिंपरखेड ता. आष्टी येथे झाला असून अर्जदारास संदरडू जन्म वी कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. करीता सदरहू अर्जदाराचे कायदेशीर जन्माचे दिनांक कायदेशीर नहे असे कोणास समाजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्या प्रसिद्धीपासून दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कब्दात आणि ह्या लेखावर असे कळविण्यात येते कि, जर सदर मुदतीत कोणी धोग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सादर कर्जदारांच्या हक्काबदल लागलीच दुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत आलास यांना सदर जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१०/१०/२०१४ रोजी माझे सही शिक्यानिशी दिला.

**आदेशावरून**
**स्वाक्षरीत**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसीलदार आष्टी**

### जाहीरनामा

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत**

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी सुधारणा कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये

सर्व जनतेस मौजे पिंपरखेड ता. आष्टी यांना जाहीर केले जाते कि अर्थदार श्री ऋषिकेश डीगु भोसले रा. पिंपरखेड ता. आष्टी जि. बीड यांनी त्यांचे मुलगा नामे सौरभ ऋषिकेश भोसले यांचा जन्म दि. १४/०४/२०१८ रोजी मौजे पिंपरखेड ता. आष्टी येथे आला असुन सदरहू जन्मची नोंद कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे कायदेशीर जन्माचे दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावर असे कळविण्यात येते कि, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदर अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आदि १०/१०/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

**आदेशावरून**
**स्वाक्षरीत**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसीलदार आष्टी**

### जाहीरनामा

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत**

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये

सर्व जनतेस मौजे पिंपरखेड ता. आष्टी, यांना जाहीर केले जाते कि, अर्जदार श्री. ऋषिकेश डीगु भोसले रा. पिंपरखेड ता. आष्टी जि. बीड यांनी त्यांचे मुलगी नामे कु. रिशिका ऋषिकेश भोसले हीचा जन्म दि.२४/०४/२०२२ रोजी गौणे पिंपरखेड ता. आष्टी येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. करीता सदरहू अर्जदाराचे कायदेशीर जन्माचे दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे जसेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती काळवाव्यात आणि ह्या लेखावरण असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न बाखवल्या तर सदर कार्यालय सादर अर्जदार ह्यांच्या हक्काबदल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल. बाज दि. १०/१०/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

**आदेशावरून**
**स्वाक्षरीत**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसीलदार आष्टी**

पान ६ वरून...

### पत्रकारांसाठी महामंडळ

महामंडळाची ओळख आहे,' असेही एस.एम.देशमुख यांनी स्पष्ट केले.

कोणी केली होती ही मागणी?

पत्रकारांसाठी महामंडळ स्थापन करण्याची मागणी राज्यातील कोणत्याही प्रमुख पत्रकार संघटनेनं केलेली नाही किंवा कोणत्याही प्रमुख पत्रकार संघटनेशी सरकारने यासंदर्भात चर्चा, विचारविनिमय केलेला नाही. त्यामुळे निवडणूक काळात पत्रकारांसाठी ही आम्ही काहीतरी करतो आहोत, एवढ्यापुरताच आमच्या लेखी या घोषणेला अर्थ आहे. पत्रकारांना गाजर दाखविण्याचा प्रयत्न या घोषणेच्या माध्यमातून सरकारनं केला आहे, असेही देशमुख यांनी सांगितले. 'प्रेस कॉन्सिल ऑफ इंडिया'च्या धर्तीवर महाराष्ट्रात प्रेस कॉन्सिल स्थापन करावी, अशी पत्रकार संघटनांनी विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना मागणी केली होती. विलासराव देशमुख त्याबाबत सकारात्मक होते. मात्र तेव्हा ते झाले नाही. नंतरही महत्वाच्या पत्रकार संघटना याचा पाठपुरावा करीत राहिल्या. परंतू त्याकडे सत्ताधारी पक्षांनी दुर्लक्ष करून महामंडळासारखी सवंग घोषणा आज केली आहे. पत्रकारांना कामगारांच्या श्रेणीत लोटण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. यातून पत्रकारांच्या हाती काही लागणार नाही हे स्पष्ट असून आम्हाला हे महामंडळ मान्य नाही,' असेही देशमुख म्हणाले.

### बीड विधानसभा मतदार

व सदरील गावातील शेतकर्यांच्या विरोधामुळे व होत असलेल्या गैरसोयीमुळे प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेश ऑगस्ट २०२१ रोजी प्रशासनाकडून रद्द करण्यात आलेले आहे. ते रद्द होत असतांना त्याऐवजी एकूण ९ कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे होणे बाबत सुधारित सूचना देखिल प्रसारित करण्यात आलेली आहे. या बंधार्याच्या प्रकल्पामुळे १.७४ दलघमी पाणीसाठा उपलब्ध होवून सिंचन क्षेत्र ३९० हेक्टर ओलीताखाली येणार आहे. त्यासाठी आजमित्तीला २२० कोटीच्या दरम्यान प्रशासकीय खर्च लागणार आहे या बाबत राज्य शासन आर्थिक तरतुद करू शकते आणि यातुन बीड मतदार संघातील नागरिकांची अनेक दिवसांपासून असलेली मागणी पुर्ण होईल आणि या भागातील शेतकरी बांधव यांच्या सिंचनाचा व नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लागेल.

### भगवान भक्ती गडावरील

पत्रकार परिषदेला होती. यावेळी भगवान भक्ती गडावर होणाऱ्या मेळाव्याची सविस्तर माहिती देण्यात आली. संत श्रेष्ठ भगवान बाबा यांचे जन्मस्थान असलेल्या सावरगाव घाट मध्ये आमदार पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्रातील अठरापगड जातीचा जनसामुदाय या ठिकाणी एकत्र येतो . या माध्यमातून विचाराचे सोने लुटण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून अविरत चालू आहे.

### लुगडे महाराज व केशव साबळेवर

पासून ४० किलोमीटर अंबाजोगाई तालुक्यातील गावात पक्षाच्या वतीने आयोजित शेतकरी संवाद यात्रेत होते याचा सगळा पुराव्यानिशी फुटेज मोबाईल लोकेशन हे पोलिसांना पुरावा म्हणून दिलेले आहे. तरी ही खोटी अट्रोसिटी रद्द करावी व महिलावर झालेला भ्याड हल्ल्याच्या आरोपींना कडक शासन करावे याच्या विरोधात गुरुवार १० ऑक्टोबर २०२४ रोजी परळी शहरातील संभाजीनगर पोलीस स्टेशनवर हजारो नागरिकांनी एकत्र येऊन पोलीस प्रशासनाला निवेदन दिले. या निवेदनाची दखल प्रशासनाने घेऊन योग्य ती कायदेशीर कारवाई करावी अन्यथा यापेक्षाही उग्र स्वरूपाचे आंदोलन लोकशाही मार्गाने करण्यात येईल असा इशारा नागरिकांनी यावेळी दिला.तसेच परळी मध्ये कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न खूप गंभीर झाला आहे गुंडागर्दी, दादागिरी, दहशत हे सर्व रोखण्यामध्ये प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरला असून पोलीस प्रशासनाला हाताशी धरून या भागातील सत्ताधारी खोटेनाटे गुन्हे दाखल करून सर्व सामान्य नागरिक व राजकीय सामाजिक क्षेत्रातील लोकांना जाणून-बुजून हेतूपूर्वक राजकीय लोकांना वारंवार टारगेट करून गुन्हे दाखल करत आहेत. असे प्रकार तात्काळ थांबवा अशी मागणी याप्रसंगी नागरिकांनी केली असून या वेळी निवेदन देण्यासाठी परळी मतदारसंघातील हजारो नागरिक परळी पोलीस स्टेशनमध्ये उपस्थित झाले होते.

### लखलखत्या दिव्यांनी

महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन या अंतर्गत महिलांसाठी अनेक स्पर्धा घेण्यात येत आहेत.मंगळवारी पुजा ताट सजावट स्पर्धा पार पडली.यावेळी संपुर्ण हॉलमधील दिवे बंद करण्यात आले होते.स्पर्धक महिलांनी आकर्षक व वेगवेगळ्या पध्दतीने पुजेचे ताट सजविल्यानंतर ताटातील आरती पेटवण्यात आल्या.यावेळी संपुर्ण परिसर दिव्यांच्या लखलखाटाने उजाळुन निघाला होता.या पुजा ताट स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना आज दि.११ ऑक्टोबर रोजी बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.

### डॉक्टर पतीला मारहाण व

पोचल्याने काही आरोपी तिथून फरार झाले. त्यातील काही आरोपी हे घटनास्थळी पकडले गेले. चौकशी दरम्यान त्यांनी इतर आरोपींची नवे सांगितली. त्याप्रमाणे फिर्यादीने आठ लोकांविरुद्ध गु.र क्रं २७९/२०२४ कलम ३०९(६), ३१०(२),२८१,३२४(४)६१ (२) फिर्याद देऊन गुन्हा दाखल केला. त्यानंतर आरोपीचे वकील यांनी आरोपी कैलास पडुळे व रंजीत सावंत यांची अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयात दाखल केला. आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून सदरील दोन आरोपींची अटकपूर्व जामीन जिल्हा व सत्र न्या. श्रीमती घरत मॅडम यांनी मंजूर केली. सदर प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. कमलकिशोर पारिख यांनी कामकाज पाहिले. त्यांना ॲड. अक्षय कामळे व ॲड. शिंदे मॅडम यांनी सहकार्य केले.

### शहरात विकासासाठी करोडो

मंजूर करून घेतली. यासाठी अकरा कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून हा रस्ता दर्जेदार होणार आहे. तसेच भाग्यनगरचा डीपी रोड साठी जिल्हा नियोजन समितीमधून चार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून घेतला. वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून मधून अण्णाभाऊ साठे पुतळा ते मिसाळ टावर पर्यंतचा मोठा नाला व सिमेंट रस्ता बांधकामासाठी दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून घेतला. आता या रस्त्याचे कामे झाल्यामुळे भाग्यनगरचा विकासामध्ये व सौंदर्यकारणामध्ये भर पडली असून या भागातून जाणारी जड वाहतुकी बद करून ईतर ठिकाणी वरून वळविण्या साठी प्रयत्न केले जातील असे वर्ष नाव पण येते तथा *माजी राज्यमंत्रीअर्जुनराव खोतकर यांनी मुक्तेश्वर द्वार ते अण्णाभाऊ साठे पर्यंत मुख्य रस्त्याचे सीसी रिमिक्स पद्धतीने बांधकाम भूमिपूजन प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले .याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांची प्रमुख उपस्थिती होती .१० ऑक्टोंबर रोजी अण्णाभाऊ साठे स्मारक ते मुक्तेश्वर प्रवेशद्वारे रस्त्याचे भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता कार्यक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी प्रथम अण्णाभाऊ साठे पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला व उद्योगरत्न पद्मभूषण रतनजी टाटा यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे , भाजपचे जिल्हा अध्यक्ष , भास्कर दानवे, राजेश राऊत, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, आदी मान्यवर उपस्थित होते.

### सावीज् ब्युटीशॉपीने हजारो

नियोजन हिरकणीच्या हेमा विभुते यांने केले यावेळी जयदत्तजी आण्णा क्षीरसागर विचारमंच महीला आघाडी बीड विधानसभा प्रमुख सौ जयश्री विलास विधाते यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी सविता पोरवाल यांनी ब्युटी शॉपी च्या माध्यमातून ब्युटीपार्लर, मेकअप आर्टिस्ट प्रशिक्षण, सेमिनार आणि नवोदित व्यावसायिक ब्युटीशियन आणि मेकअप आर्टिस्ट तसेच घरगुती स्वरूपातील व्यावसायिक महीलांना मार्गदर्शन तसेच सवलतीच्या दरात साहीत्य उपलब्ध करून दिल्यामुळे अनेक गरजु महीला आणि मुलींना स्वतःच्या पायावर उभा राहुन अर्थिक सक्षम होता आले असे गौरवोद्गार सौ. विधाते यांनी या प्रसंगी व्यक्त केले.

# २ महिन्यात किसान रेल सुरु करा, अन्यथा राज्यव्यापी रेल रोको आंदोलन करणार

अहमदनगर, पुणे, सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात फळे, फुले व भाजीपाला पिकतो. परंतु किसान रेल बंद आहेत व प्रवाशी जलद रेल्वे गाड्यांमध्ये अपुरी जागा असल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. नुकसान टाळण्यासाठी या मार्गावर किसान रेल सुरू करावी या मागणीसाठी स्वतंत्र भारत पक्ष, जन संसद संघटना व पीपल्स हेल्पलाईन या सामाजिक संघटना ७ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालया समोर एक दिवसीय ठिय्या आंदोलन करण्यात आले होते. दरम्यान, शासनाने जर दोन महिन्यात किसान रेल सुरू केली नाही तर राज्यव्यापी रेल रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा स्वतंत्र भारत पक्षने दिला आहे.

## अनिल घनवटांचा इशारा





लवकरात लवकर किसान रेल सुरु कराव्यात

शेतकऱ्यांचा नाशिवंत शेतीमाल लवकरात लवकर व कमी खर्चात देशातील इतर बाजार पेठेत पोहोचवता यावा म्हणून केंद्र शासनाने अनेक किसान रेल सुरू केल्या होत्या. शेतकऱ्यांना त्याचा फायदा होता होता. मात्र सरकारने बऱ्याच किसान रेल बंद केल्या आहेत. महाराष्ट्रातून उत्तर भारतात व पूर्वेकडच्या राज्यांमध्ये जाणाऱ्या जलद प्रवासी गाड्यांमध्ये फक्त अर्धा डबा (बोगी) पार्सल साठी असतो. मोठ्या शहरातून सुटणाऱ्या गाड्यांमध्ये आगोदरच औद्योगिक कारखान्यांचा स्टील, लोखंडाचा माल, गाड्यांचे सुटे भाग भरले जातात. पुढील स्टेशनवर येणारा शेतमाल चढविण्यासाठी जागा रहात नाही. या परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचा माल पाठवला जात नाही व खराब होऊन जातो. पार्सलच्या डब्यात जागा कमी आल्यामुळे माल चाढवणारे ठेकेदार, प्राधान्य देण्यासाठी शेतकऱ्यांकडून अव्वाचे सव्वा हमाली वसूल करतात.

अहमदनगर कार्यालयासमोर एक दिवसीय ठिय्या आंदोलन

रेल्वे मंत्रालयाने बंद केलेल्या किसान रेल सुरू कराव्यात, गरज असेल तेथे नवीन किसान रेल सुरू कराव्यात. जेथे किसान रेलची सुविधा नाही तेथे प्रत्येक जलद प्रवासी गाडीला एक स्वतंत्र बोगी फक्त शेतीमालासाठी जोडण्याची व्यवस्था करावी या मागणीसाठी करण्यात आली. जर शासनाने किसान रेल दोन महिन्यात सुरू केली नाही तर राज्यव्यापी रेलरोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा अनिल घनवट यांनी दिला आहे. दरम्यान,७ ऑक्टबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून सायं ४ वाजे पर्यंत जिल्हाधिकारी अहमदनगर कार्यालयासमोर एक दिवसीय ठिय्या आंदोलन करण्यात आले होते. शेतकऱ्यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. या आंदोलनास स्वतंत्र भारत पक्ष, शेतकरी संघटना, भारतीय जनसंसद, पीपल्स हेल्पलाईन या संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते. या प्रसंगी अनिल घनवट, सीमाताई नरोडे, ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, विक्रम शेळके, लक्ष्मण रांजणे, शरद गद्रे, नीलेश शेडगे, सुनीता वानखेडे आदी नेत्यांची भाषणे झाली. आंदोलकांचा निवेदन निवासी जिल्हिाकारी राजेंद्र पाटील यांनी निवेदन स्वीकारले अशी माहिती स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी दिली आहे.




### महत्वाच्या घटना

१८४६ : एलियास होवे याला अमेरिकेत शिवणाच्या मशिनचे पेटंट मिळाले.
१८९८ : लुइगी लुकेनीने ऑस्ट्रियाची राणी एलिझाबेथची हत्या केली.
१९३९ : दुसरे महायुद्ध कॅनडाने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४३ : दुसरे महायुद्ध जर्मन फौजांनी रोम ताब्यात घेण्यास सुरूवात केली.
१९३६ : प्रथम जागतिक वैयक्तिक मोटरसायकल स्पीडवे चॅम्पियनशिप आयोजित करण्यात आली.
१९६६ : पंजाब राज्याचे विभाजन होऊन पंजाब व हरियाणा अशी दोन राज्ये अस्तित्वात आली.
१९६७ : जनमत चाचणीत जिब्राल्टरच्या जनतेने स्पेनमधे सामील होण्याऐवजी ब्रिटनमधेच राहण्याचा निर्णय घेतला.
१९७५ : व्हायकिंग-२ हे अमेरिकन मानवविरहित अंतराळयान मंगळ ग्रहाकडे झेपावले.
१९९६ : गोमंतक मराठी अकादमीचा पहिला 'कृष्णदास शामा पुरस्कार' गोमंतकीय मराठी साहित्यिक बा. द. सातोस्कर यांना तर 'पंडित महादेवशास्त्री जोशी मराठी साहित्य पुरस्कार' कवी नारायण सुर्वे यांना जाहीर
२००१ : मार्क इन्ग्रॅम या स्पर्धकाने फसवणूक करुन इंग्लंडमधील कौन बनेगा करोडपती ही स्पर्धा जिंकली.
२००२ : परंपरेने तटस्थ देश स्वित्झर्लंड देश युनायटेड नेशन्समध्ये सामील झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७२ : के. एस. रणजितसिंहजी कसोटी क्रिकेट खेळाडू व महाराजा, यांच्या स्मरणार्थ १९३४ पासून 'रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा' खेळल्या जातात. (मृत्यू: २ एप्रिल १९३३)
१८८७ : गोविंद वल्लभ पंत स्वातंत्र्यसैनिक, भारताचे दुसरे गृहमंत्री व उत्तर प्रदेशचे पहिले मुख्यमंत्री, भारताचे पहाडी पुरूष, प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष, भारतरत्न (१९५७), मागासवर्गीयांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी कुमाँऊ परिषदेची स्थापना केली. (मृत्यू: ७ मार्च १९६१)
१८९२ : नोबेल पारितोषिक विजेता अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ आर्थर कॉम्प्टन यांचा जन्म.
१८९५ : कविसम्राट तेलुगू लेखक विश्वनाथ सत्यनारायण यांचा जन्म.
१९८९ : भारतीय क्रिकेटपटू मनीष पांडे यांचा जन्म.
१९१२ : बसप्पा दानप्पा तथा बी. डी. जत्ती भारताचे ५ वे उपराष्ट्रपती, पाँडेचरी व ओरिसाचे राज्यपाल आणि मैसूर प्रांताचे मुख्यमंत्री, राष्ट्रपती फख्रुद्दीन अली अहमद यांच्या आकस्मिक निधनामुळे जत्ती यांच्यावर राष्ट्रपतीपदाची जबाबदारी आली. पाच महिने ते हंगामी राष्ट्रपती (मृत्यू: ७ जून २००२)
१९४८ : भक्ती बर्वे अभिनेत्री (मृत्यू: १२ फेब्रुवारी २००१)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

२१० : २१० इ.स.पू. : चीनची पहिले सम्राट किन शी हुआंग यांचे निधन. (जन्म: १८ फेब्रुवारी २५९)
१९०० : रावबहादूर डॉ. विश्राम रामजी घोले महात्मा फुले यांचे सहकारी व नामवंत शल्यचिकित्सक (जन्म:)
१९२३ : सुकुमार रॉय बंगाली साहित्यिक आणि 'संदेश' या लहान मुलांच्या मासिकाचे संस्थापक, चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रॉय यांचे वडील (जन्म: ३० आक्टोबर १८८७)
१९६४ : श्रीधर पार्सेकर व्हायोलिनवादक (जन्म:१९२०)
१९८३ : नोबेल पारितोषिक विजेते स्वीस भौतिकशास्त्रज्ञ फेलिक्स ब्लॉक यांचे निधन.
२००० : भारतीय-पाकिस्तानी पत्रकार आणि लेखक झैब-अन-नसीसा हमीदल्ला यांचे निधन. (जन्म: २५ डिसेंबर १९२१)
२००६ : टोंगाचा राजा टॉफाहाऊ टुपोऊ यांचे निधन.

# शेळ्यांचे जंत निर्मुलन वआरोग्य व्यवस्थापन



शेळीला गरीबाची गाय असे संबोधले जाते. शेळी ही रोगाला फारशी बळी पडत नाही, परंतु विशेषतः पावसाळ्यात शेळीची विशेष काळजी घ्यावी लागते. त्याकरिता वेळेवर लसीकरण करणे, नियमित जंत निर्मुलन, गोठ्याची स्वच्छता, गव्हाणीचा वापर या बाबींचा आरोग्यावर निश्चित परिणाम होतो.

शेळ्यांच्या जंतनिर्मुलनासाठी जंतनाशकाचा वापर : शेळ्यांची सदृढ पचनसंस्था व आरोग्यासाठी जंत निर्मुलन करून घेऊन खालीलप्रमाणे जंतनाशक औषधांचा वापर करावा. करडांच्या वयाच्या २० ते ३० दिवसापासून जंतनाशक औषधे देता येतात. जानेवारी व जुलै - अल्बेन्डाझॉल १० मि.ग्रॅ. प्रति किलो वजनाप्रमाणे चपटेकृमी व गोलकृमी जंतांच्या निर्मुलनासाठी वापरावे. एप्रिल व ऑक्टोबर - डोस्टोडीन किंवा झोनील पैकी कोणतेही एक औषध यकृत कृमीच्या निर्मुलनासाठी १० मि.ग्रॅ. प्रतिकिलो वजनाप्रमाणे वापरावे.

लाळयाखुरकत : हा विषाणूजन्य रोग आहे. या रोगाच्या प्रमुख लक्षणामध्ये शेळ्यांच्या जिभेवर तोंडात, पायात, कासेवर आणि तोंडाच्या आतील भागावार फोड येतात. तोंडातून जास्त प्रमाणात लाळ पडते. उपचार व प्रतिबंध : या रोगामुळे शेळ्यांचे खाणे-पिणे कमी होते. त्यामुळे शेळ्या कमजोर होतात. त्याकरिता त्यांना पाण्यातून जीवनसत्त्वे द्यावेत. जिभेचे फोड अन्टीसेप्टीक औषध लावून धुवावे. प्रतिबंधात्मक उपचाराकरिता वर्षातून दोन वेळा लस टोचून घ्यावे. (१ मि.ली.).वरीलप्रमाणे शेळ्यांचे व्यवस्थापन केल्यास शेतकऱ्यांना शेळीपालन एक किफायतशीर व्यवसाय फायद्याचा ठरेल व शेळीपालकांचा आर्थिक स्तर उंचावेल.

# डाळिंबावरील तेल्या रोगाचे व्यवस्थापन

राज्यात मोठ्या प्रमाणात डाळिंबाचे उतपादन घेतले जाते. सद्यस्थितीत महाराष्ट्रामध्ये डाळिंब पिकाखाली ७३०२७ हेक्टर क्षेत्र असून त्यापैकी सुमारे ४१००० हेक्टर क्षेत्र उत्पादनाखाली आहे. त्यापासून ४१०००० मेट्रीक टन इतके उत्पादन व ३२८ कोटी रुपये उत्पन्न मिळते. डाळिंबावर पडणाऱ्या तेल्या या रोगाविषयीची माहिती घेणे आवश्यक असून, यावर नियंत्रण ठेवले तर उत्पादनात चांगली भर पडते.



या रोगाची लक्षणे : डाळिंबावरील बॅक्टेरीयल ब्लाईट रोग म्हणजेच तेल्या हा प्रामुख्याने जिवाणूजन्य असून झॅन्थोमोनास एक्झानोपोडीस पीव्ही पुनीकिया जिवाणूमुळे होतो.

या रोगास अनु जीव जन्य करपा असे म्हणतात. महाराष्ट्रात या रोगाचा शिरकाव रोगग्रस्त कलमांद्वारे झालेला असून या रोगाचा प्रादुर्भाव सर्वप्रथम कर्नाटक राज्याच्या सीमेलगतचा भागात डाळिंबाच्या रुबि या जातीवर सर्वप्रथम दिसून आला. या रोगामुळे डाळिंबावर तेलकट डाग पडतात. याचा प्रादुर्भाव पाने, फुले खोड आणि फळांवर होतो.

पान : सुरुवातीस पानावर लहान तेलकट किंवा पाणथळ डाग दिसतात. कालांतराने काळपट होतात व डागा भोवती पिवळे वलय दिसते. तसेच ते मोठे होऊन तपकिरी ते काळे रंगाचे होतात. उन्हात हे डाग बघितले की तेलासारखे चमकतात. डाग मोठा झाल्यावर पाने पिवळी पडून गळून पडतात.

फुल : फुलांवर व कळ्यांवर गर्द तपकिरी व काळपट डाग पडतात. पुढे यामुळे फुलांची व फळांची गळ होते.


खोडावरील व फांद्या वरील: प्रामुख्याने खोडावर व फांद्यांवर सुरुवातीला काळपट किंवा तेलकट डाग गोलाकार दिसतात. खोडावर या डागाणे गर्द लिंग किंवा खाच तयार होते व तेथून झाड मोडते. तसेच फांद्यांवर डागांची तीव्रता वाढल्यावर फांद्या डागा पासून मोडतात.

फळे : फळावर सुरुवातीला एकदम लहान आकाराचे पाणथळ तेलकट डाग दिसतात.कालांतराने हे डाग तपकिरी काळपट दिसतात व त्यावर भेगा पडतात. फळांवर लहान डाग एकत्र आले की मोठ्या डागात रूपांतर होते. फळांवर या डागांमुळे आडवे उभे तडे जातात. फळांची प्रत पूर्णपणे खराब होते व तडे मोठे झाल्यावर फळे सडतात आणि गळून पडतात.

तेल्या रोगाचे एकात्मिक रोग नियंत्रण : रोप कॅल्शियम हायड्रोक्लोराइड निर्जंतुक केलेल्या खड्ड्यात लावावे. रोपांची लागवड कमीत कमी साडेचार मीटर बाय ३० मीटर अंतरावर करावी आणि प्रत्येक ठिकाणी तीन खोड ठेवावी. स्वच्छता मोहीम काळजीपूर्वक राबवावी. खाली जमिनीवर पडलेली पाने गोळा करून नष्ट करावेत. बहार धरताना जमिनीवरील रोगट जिवाणूंची संख्या कमी करण्यासाठी ब्लिचिंग पावडर दीडशे ग्रॅम प्रति पाच ते सहा लिटर पाण्यात मिसळून झाडाखाली भिजवन करावी किंवा झाडाखाली भुकटी हेक्टरी २० किलो धुरळावी. फळे काढणी पावसाळ्यात झाली असेल तर ब्रोनोपोल ५०० पीपीएम फवारावे. ( ब्रोमोपोल ५० ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्यात). संपूर्ण फळे काढणी झाल्यानंतर बागेला तीन महिने विश्रांती घ्यावी. बहार घेण्यापूर्वी संपूर्ण पानगळ करून घ्यावी तसेच रोगट फांद्यांची छाटणी करावी. खाली पडलेली संपूर्ण पाने व छाटलेली रोगट अवशेष गोळा करून जाळून टाकावीत. छाटणी करताना कात्री प्रत्येक वेळी एक टक्का डेटॉल च्या द्रावणात निर्जंतुक करून घ्यावी. छाटणी झाल्यानंतर लगेच कापलेल्या भागावर १० टक्के बोर्डो पेस्ट लावावी. झाडाच्या खोडाला नीम ओईल + बॅक्टेरिया नाशक ( ५०० पीपीएम)+ कॅप्टन ०.५ टक्के याचा मुलामा द्यावा. पानगळ व छाटणीनंतर बॅक्टेरिया नाशक + कॅप्टन ०.५टक्के यांची फवारणी करावी. नवीन पालवी फुटल्यावर बॅक्टेरिया नाशक ( २५० पीपीएम)/ बोर्डो मिश्रण ( एक टक्का )+ कॅप्टन (०.२५ टक्के) ची फवारणी करावी.

# फिंगर बाजरी उत्पादन तंत्रज्ञान

ही फिंगर बाजरी, आफ्रिकन फिंगर बाजरी, लाल बाजरी आणि नाचणी म्हणून ओळखले जाते, हे सर्वात जुने अन्न आणि घरगुती कारणासाठी वापरले जाणारे पहिले अन्नधान्य आहे. फिंगर बाजरी मूळतः इथिओपियन उच्च प्रदेशातील आहे आणि सुमारे ४००० वर्षांपूर्वी भारतात दाखल झाली होती. ते कोरड्या हवामानात घेतले जाऊ शकतात; तीव्र दुष्काळी परिस्थितीचा सामना करू शकतो आणि उच्च उंचीवर जुळवून घेऊ शकतो. हे कमी कालावधीचे आहेत, ६५ दिवसात कमी कापणीसाठी तयार आहेत आणि वर्षभर सहजपणे पिकवता येतात. हे सर्व लहान बाजरींमध्ये जास्त घेतले जाणारे पीक आहे. इतर सर्व तृणधान्ये आणि बाजरी यांच्या तुलनेत हे प्रथिने आणि खनिजांचा समृद्ध स्रोत आहे. त्यात महत्वाचे अमीनो ॲसिड असतात. त्यात कॅल्शियम (३४४ मिलीग्राम) आणि पोटॅशियम (४०८ मिलीग्राम) सर्वाधिक आहे. कमी हिमोग्लोबिन पातळी असलेल्या लोकांसाठी हे फायदेशीर आहे कारण ते लोहाचा उत्तम स्रोत आहे.



जमीनीचा प्रकार : हे समृद्ध चिकणमातीपासून ते चांगल्या ऑर्गॅनिक पदार्थासह उथळ उथळ जमिनीपर्यंतच्या विविध प्रकारच्या मातीवर घेतले जाऊ शकते. पाण्याचा चांगला निचरा होणारी काळी माती देखील लागवडीसाठी विचारात घेतली जाऊ शकते कारण हे पीक काही प्रमाणात पाणी साचण्यास शाश्वत आहे. पीएच ४.५-८ असलेल्या जमिनीत फिंगर बाजरी चांगली वाढतात. ज्या जमिनीत पाणी साचण्याची समस्या आहे अशा जमिनीचा वापर फिंगर बाजरी लागवडीसाठी करू नये.

लोकप्रीय आणि प्रचलीत वाण : व्हीएल मांडुआ १०१, व्हीएल मांडुआ २०४, १२४, १४९, १४६, व्हीएल मांडुआ ३१५ (१०५-११५ दिवसांत परिपक्वता) आणि मांडुआ ३२४ (१०५-१३५ दिवसांत परिपक्वता). पीइएस ४०० - ९८-१०२ दिवसांत कापणीसाठी तयार. ते सरासरी ८ क्विंटल/एकर उत्पादन देते. ही लवकर पक्व होणारी जात असून ती स्फोटास प्रतिरोधक आहे.पीइएस १७६ - १०२-१०५ दिवसांत कापणीसाठी तयार. ८-९ क्विंटल/एकर सरासरी उत्पादन देते. बिया तपकिरी रंगाच्या असतात आणि ते स्फोटास प्रतिरोधक असतात. केएम ६५ - ९८-१०२ दिवसात कापणीसाठी तयार. ८-१० क्विंटल/एकर सरासरी उत्पादन देते. व्हीएल ३१५ - १०५-११५ दिवसात कापणीसाठी तयार. हे सरासरी १०-११ क्विंटल/एकर उत्पादन देते. व्हीएल १४६ - ९५-१०० दिवसात कापणीसाठी तयार. ते ९८-१०२ क्विंटल/एकर सरासरी उत्पादन देते. ही जात स्फोटास प्रतिरोधक आहे. व्हीएल १४९ - ९८-१०२ दिवसात कापणीसाठी तयार. सरासरी १०-११ क्विंटल/एकर देते. विस्तृत रूपांतर आणि कानातलेपणा आणि स्फोटास प्रतिरोधक. व्हीएल १२४ - ९५-१०० दिवसात कापणीसाठी तयार. सरासरी उत्पादन १० क्विंटल/एकर. बियाण्यांसाठी तसेच चाऱ्यासाठी चांगले.

इतर राज्य जाती : व्हीएल मांडुआ - ३५२ : तामिळनाडू आणि महाराष्ट्र वगळता सर्व राज्यांसाठी लागवडीसाठी लागू. ९५ ते १०० दिवसात काढणीस तयार. ते ८-१० क्विंटल/एकर सरासरी उत्पादन देते. व्हीआर ७०८ : ही दुष्काळ सहन करणारी वाण आहे. लागवडीसाठी सर्व राज्यांसाठी लागू.

जमीन तयार करणे : पावसावर अवलंबून असलेल्या पिकामध्ये जमिनीतील ओलावा टिकवण्यासाठी मुख्य शेतात २-३ वेळा खोल नांगरणी करावी. पेरणीपूर्वी दुय्यम मशागतीची मशागत आणि गुळगुळीत बियाणे तयार करण्यासाठी मल्टिपल टूथ कुदळ आवश्यक आहे. पेरणीपूर्वी जमीन गुळगुळीत करण्याच्या किरकोळ ऑपरेशन्स करा, यामुळे परिस्थितीतील आर्द्रतेचे चांगले संरक्षण होते. उत्तरांचलमध्ये जेथे वारंवार नांगरणी करणे कठीण असते तेथे प्रभावीपणे खोदणे आणि माती वळवणे, बारमाही तण काढून टाकणे, जमीन गुळगुळीत करणे, उथळ नाल्याद्वारे आतील बाजूस उतार देणे यामुळे पावसाचे अतिरिक्त पाणी बाहेर काढण्यास मदत होते.१) पीक पद्धती: फिंगर बाजरी पिकामध्ये पीक फिरविणे खूप महत्वाचे आहे. हे उच्च उत्पादन देते, रासायनिक खताचा वापर कमी करते आणि मातीची सुपीकता टिकवून ठेवण्यास मदत करते. उत्तर भारतात, हरभरा, मोहरी, तंबाखू, बार्ली, जवस यासह बोटांच्या बाजरी पिकासाठी सामान्यतः अनुसरण केले जाते. २) आंतरपीक : पंजाबमध्ये बाजरी आणि सोयाबीन ९०:१०० टक्के प्रमाणात वजनानुसार मिसळून पेरणीही केली जाते. खरिपातील फिंगर बाजरी + सोयाबीन आणि रब्बीमध्ये ओट्स हे उत्तर डोंगराळ प्रदेशासाठी एक आदर्श आणि फायदेशीर पीक क्रम आहे.

# द्राक्ष व्यापाऱ्यांना ओळखपत्र देण्याची मागणी



सांगली : द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी संबंधित द्राक्ष व्यापाऱ्यांना पोलिसांकडून ओळखपत्र देण्यात यावे, अशी मागणी द्राक्ष बागायतदार संघाचे अध्यक्ष दत्ताजीराव पाटील यांनी पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्याकडे केली.

या बाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की गेल्या तीन वर्षांच्या हंगामांमध्ये व्यापाऱ्यांकडून फसवणूक झाली आहे. द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे पैसे मिळण्यासाठी व येत्या द्राक्ष हंगामामध्ये द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये, याकरिता द्राक्ष माल खरेदीसाठी येणाऱ्या व्यापारी यांची सर्व माहिती कृषी उत्पन्न बाजार समित्यांमार्फत गोळा करून त्याची एनओसी तयार करून पोलिस स्टेशनला पाठवावी व पोलिस विभागाकडून संबंधित व्यापाऱ्यास परवाना देण्यात यावा. कार्यक्रमावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती सुजय शिंदे, संघाचे पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

गेल्या तीन वर्षांत ज्या द्राक्ष उत्पादकांची फसवणूक झाली आहे त्यांनी व्यापाऱ्यांचे नाव, रक्कम या बाबतची माहिती पुराव्यासह द्राक्ष बागायतदार संघाकडे द्यावी. पोलिस प्रशासनाच्या मदतीने ही भरपाई रक्कम वसुलीसाठी प्रयत्न केले जाणार आहेत. त्यामुळे माहिती जमा करावी, असे आवाहन द्राक्ष बागायतदार संघाने केले आहे.

# मराठी पत्रकार परिषदेच्या राज्य अध्यक्षपदी अष्टीवकर

## कार्याध्यक्ष काटकर ,सरचिटणीस प्रा. नाईकवाडे,कोषाध्यक्ष मन्सुरभाई शेख तर विस्वस्तपदी शरद पाबळे

## सर्वसाधारण सभेत मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांची घोषणा



मुंबई। प्रतिनिधी

८६ वर्षांची देदीप्यमान परंपरा असलेल्या मराठी पत्रकार परिषदेच्या नवीन पदाधिकाऱ्यांची निवडी करण्यात आल्या असून नुकत्याच झालेल्या निवडणुकीत कार्याध्यक्ष म्हणून सांगलीचे पत्रकार शिवराज काटकर आणि सरचिटणीस म्हणून परभणीचे पत्रकार सुरेश नाईकवाडे यांची बिनविरोध निवड झाली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी अनिल भोळे यांच्यावतीने एस.एम.देशमुख यांनी दि.९ ऑक्टोबर रोजी ही घोषणा केली. रोह्याचे मिलिंद अष्टीवकर हे परिषदेचे नवे अध्यक्ष आहेत. मराठी पत्रकार परिषदेची सर्वसाधारण सभा बुधवारी (९ ऑगस्ट २०२४) मुंबई प्रेस क्लबच्या सभागृहात उत्साह पार पडली. याप्रसंगी परिषदेची नवीन कार्यकारिणी बिनविरोध निवडण्यात आली. परिषदेच्या घटनेनुसार १ सप्टेंबर २०२४ रोजी मराठी पत्रकार परिषदेच्या अध्यक्षपदी मिलिंद अष्टिवकर यांची निवड झाली होती. तर आज मुंबई येथे झालेल्या सर्वसाधारण सभेत विस्वस्त पदी शरद पाबळे,कार्याध्यक्षपदी शिवराज काटकर, सरचिटणीसपदी प्रा.सुरेश नाईकवाडे व कोषाध्यक्षपदी मन्सूरभाई शेख यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

परिषदेच्या विश्वस्त पदाची एक जागा रिक्त होती. त्या जागेवर माजी अध्यक्ष शरद पाबळे यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली आहे. परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी ही घोषणा केली. याप्रसंगी परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्ष अनिल वाघमारे यांच्यासह राज्याच्या विविध भागातून आलेले परिषदेचे आजी-माजी पदाधिकारी मोठ्या संख्येनं उपस्थित होते. दरम्यान, नवीन कार्यकारिणीने परिषदेची सूत्र हाती घेतली असून आता पुढील पंधरा दिवसांमध्ये कार्यकारिणी सदस्य, उपाध्यक्ष, विभागीय सचिव पदाच्या नियुक्त्या जाहीर करण्यात येणार आहेत, अशी माहितीही एस.एम.देशमुख यांनी याप्रसंगी दिली.

स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापना झालेली मराठी पत्रकार परिषद ही पत्रकारांची देशातील सर्वात जुनी आणि सर्वात मोठी पत्रकार संघटना आहे. परिषदेने पत्रकारांचे अनेक प्रश्न मार्गी लावले असून पत्रकारांच्या सुख दुखात सहभागी होण्याची भूमिका परिषदेने घेतलेली असल्याने पत्रकारांनी परिषदेच्या झेंड्याखाली एकत्र आलं पाहिजे असं आवाहन एस.एम.देशमुख यांनी केलं आहे. 'काळाची पावले ओळखून परिषदेने सातत्याने नव्या बदलांना अंगिकारणयाची भूमिका घेतलेली आहे. त्यामुळेच राज्यातील डिजिटल पत्रकारांसाठी ''डिजिटल मिडिया परिषद'' सुरू केली असून नुकतीच तिची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.

परिषदेच्या सदस्यांनी नव्या युगाच्या मिडियाचे महत्व लक्षात घेऊन त्याची उपेक्षा न करता डिजिटल मिडिया परिषदेला सहकार्य करावे,' असे आवाहनही देशमुख यांनी केले. 'आपली संघटना नवीन उंचीवर नेण्यासाठी प्रत्येक पदाधिकारी, सभासद यांनी आगामी काळात काम करावे. परिषदेच्या सर्व बाबी अपडेट असल्यामुळे नवीन पदाधिकारी त्यांची जबाबदारी सक्षमपणे पार पाडतील,' असा विश्वासही देशमुख यांनी व्यक्त केला. विश्वस्त किरण नाईक यांनी पदं ही मिरवण्यासाठी नाहीत तर त्या माध्यमातून संघटना भक्कम करणे आणि पत्रकारांना कायम मदत करण्याचे काम पदाधिकऱ्यांनी करावे, असे आवाहन केले. नवनिर्वाचित विश्वस्त शरद पाबळे, शिवराज काटकर, सुरेश नाईकवाडे, अनिल वाघमारे ,महीला प्रदेश अध्यक्षा जान्हवी पाटील ,पुणे विभागाचे सचिव गणेश मोकाशे,बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांनीही आपले मनोगत व्यक्त करताना संघटना अधिक भक्कम आणि व्यापक करण्यासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही दिली. निवडणूक अधिकारी अनिल भोळे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला बैठक यशस्वी करण्यासाठी मुंबई विभागाचे सचिव दीपक कैतके, अध्यक्ष राजा आदाटे, दीपक पवार आदिंनी विशेष परिश्रम घेतले.

# स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीचे दर्शन घेऊन प्रा.ईश्वर मुंडे यांनी दिली पक्षाकडे मुलाखत



धारूर । प्रतिनिधी

सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात खा.शरदचंद्र पवार हे बीग बॉस च्या भूमिकेत दिसत आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पक्षात अनेकांचे इन कमिंग होत आहेत कांही जन रांगेत उभे आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडे ज्या ईच्छूक उमेदवारांनी अधिकृत पक्षाचे सदस्यत्व फीस व नाममात्र पक्ष निधी जमा केलेला आहे अशा इच्छूक उमेदवीरांच्या मुलाखती मार्केट यार्ड पुणे येथील निसर्ग कार्यालयात दि.५ ऑक्टोबर २०२४ शनिवारी घेण्यात आल्या.

या मुलाखतीसाठी दस्तूर खुद खा.शरदचंद्र पवार,खा.फौजिया खान, खा.वंदना चव्हाण, आ.राजेश टोपे,खा.बजरंग बप्पा सोनवणे, आ.रोहीत पवार, महेबुब शेख, राज राजापूरकर, हिरालाल राठोड, डॉ.नरेंद्र काळे यांचे सह पार्लमेंट्री बोर्ड चे सदस्य उपस्थीत होते.

सर्वच इच्छूक उमेदवार पक्षाकडे मुलाखती देत आसतात परंतू प्रा. ईश्वर मुंडे यांची मुलाखत ही वैशिष्टय पूर्ण झाली. याचे कारण म्हणजे हिमालयाच्या मदतीला धावलेले सह्याद्री, पुरोगामी विचारांचा वसा व वारसा चालवणारे, खा.शरदचंद्र पवार यांचे श्रध्दास्थान, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या प्रिती संगम (कृष्णा - कोयना) कराड जि. सातारा येथील समाधीचे दर्शन घेऊन,आशिर्वाद घेऊन मुलाखत दिली.

आपली पक्ष निष्ठा व खा.शरदचंद्र पवार यांच्या सोशल इंजिनिअरींच्या राजकीय खेळीमुळे आपल्यालाच उमेदवारी मिळेल या आत्मविश्वासाने प्रा.ईश्वर मुंडे यांनी मतदार संघात जन संपर्क वाढवला आहे. उच्च शिक्षीत,स्वच्छ प्रतिमा व सर्व समावेशक चेहरा या मुळे प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांना माजलगाव मतदार संघातील मतदारांकडून पसंती मिळत आहे.

## || थोडक्यात



### वसंतदादा पाटील महाविद्यालयात रतनजी टाटा यांना श्रद्धांजली

पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्थेच्या वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १० ऑक्टोबर रोजी भारताचे जगप्रसिद्ध उद्योगपती पद्मविभूषण रतनजी टाटा यांना महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र व वाणिज्य विभागाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. श्रद्धांजली कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रोफेसर प्रशांत पाटील यांनी रतनजी टाटा यांचा जीवनपट स्पष्ट करत त्यांच्या उद्योगक्षेत्रातील व सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील योजनाबद्दल माहिती दिली. याप्रसंगी प्राचार्य हांगे यांनी रतनजी टाटा यांचा वैचारिक वारसा व त्यांचे महान कार्य याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा असे मनोगत व्यक्त केले. श्रद्धांजली कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### बळीराम ईप्पर यांचे निधन

अंबाजोगाई। प्रतिनिधी



अंबाजोगाई शहरातील नागझरी परिसरात वास्तव्यास असलेले बळीराम पांडुरंग ईप्पर( वय -७५) यांचे दिनांक ८/१०/२०२४ रोजी सायंकाळी अचानक हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.बळिराम पांडुरंग ईप्पर हे अबांसाखर कारखान्याचे सेवानिवृत्त कामगार व सध्या ते अंबाजोगाई येथील नागझरी परिसरात वास्तव्यास असलेले बळीराम ईप्पर यांचा गेल्या महिन्यात ९ सप्टैबर २०२४ रोजी ७५ वा अमृत महोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.आणि एक महिन्यालाच दिनांक ८/१०/२०२४ रोजी सायंकाळच्या दरम्यान अचानक हृदय विकाराच्या तिव्र झटक्याने अखेरची प्राणज्योत मालवली.स्व.बळिराम ईप्पर यांचा आज दिनांक ९/१०/२०२४ रोजी सकाळी १० वाजता अंबाजोगाई येथील नागझरी (शेपवाडी) परिसरात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.बळिराम ईप्पर यांचे पश्चात मुले दोन बालाजी, गोविंद व मुलगी सविता, तसेच नातवंडे असा भरगच्च परिवार आहे

### २५ कोटी रुपये निधीच्या रस्ता कांमाचे आज उद्घाटन

गेवराई। प्रतिनिधी

मतदारसंघात आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रयत्नातून मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आ.लक्ष्मण पवार यांनी मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणुन मोठ्या प्रमाणात विकास कामे सध्या मतदारसंघात सुरु आहेत.त्या अनुषंगानेच मतदारसंघातील माजलगाव तालुक्यातील राममा ६१ ते हारकी निमगाव, रामपिपंळगाव, मगरुळ २, ६ की.मी. किंमत ६ कोटी, तालखेड फाटा ते तालखेड रस्ता ५ की.मी.किमंत ५ कोटी, माजलगाव रोड ते जाभंळी तांडा,४.५०० कि.मी. किंमत २ कोटी लक्ष, मतदारसंघातील बीड तालुक्यातील पेडगाव फाटा ते कांबी, सौदाना रस्ता,९.७५० क.मी.किंमत ७ कोटी २७ लक्ष गेवराई तालुक्यातील भेड खु.ते.भेड बु.रस्ता ४ की.मी.किंमत ३ कोटी,केकत पागंरी ते हारीलाल नाईक तांडा, ३ कि.मी.२ कोटी रुपयाचे आज दि.१० ऑक्टोबर रोजी युवानेते शिवराज पवार यांच्या हास्ते शुभारंभ होणार आहे तरी सर्व ग्रामस्थांनी उपस्थित रहावुन विकासाचे साक्षीदार व्हावे एक आठवड्यात तब्बल शेकडो कोटीचा निधी आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रयत्नातून मिळाला आहे

# माजलगावात शिवरत्न जिवाजी महाले जयंती साजरी



माजलगाव। प्रतिनिधी

महाराष्ट्र नाभिक महामंडळ जिल्हा बीड च्या वतीने शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दि. ९ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी वीर जिवाजी महाले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. हँगिंग डीजे, दांडपट्टा, संबळ पथक व ऑर्केस्ट्राने शहरवासी यांचे लक्ष वेधले. जयंती कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाध्यक्ष दिलीप झगडे यांचे वतीने करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन जयसिंग सोळंके यांच्या हस्ते करण्यात आले तर अध्यक्षस्थानी महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव दळे हे होते. व्यासपीठावर प्रदेश उपाध्यक्ष अच्युतराव लाटे, ज्ञानेश्वर मेंडके, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, विभागीय अध्यक्ष युवराज शिंदे, महामंडळाचे प्रदेश युवक अध्यक्ष सुरेंद्र कावरे, डॉ. सुरेश साबळे, सह्याद्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष नवनाथ गायकवाड, शामसुंदर दळवी यांची उपस्थिती होती. उद्घाटन पर मनोगत जयसिंग सोळंके यांनी व्यक्त केले तर अध्यक्षीय समारोप प्रदेशाध्यक्ष कल्याणराव दळे यांनी केला. यावेळी दांडपट्टा पथकातील सदस्यांनी चित्त थरारक अशा कवायतींचे सादरीकरण करून शहरवासीयांच्या डोळ्यांचे पारणे फेडले तर हलगी पथकातील सदस्यांनी विविध प्रकारचे वाद्य तर ऑर्केस्ट्रा पथकातील सदस्यांनी सांस्कृतिक कलागुणांचे सादरीकरण केले. यात त्यांनी गोदळ गीता सह विविध गाणे सादर केले हँगिंग डीजे च्या तालावर तरुणाई थीरकली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन टी.एन. शिंदे, रामराव लांडगे यांनी केले कार्यक्रमाचे आभार आयोजक तथा जिल्हाध्यक्ष दिलीप झगडे यांनी मानले. उत्साहात झालेल्या या कार्यक्रमात मोठा आनंद दिसून आला. कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात महिला व समाज बांधव उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नाभिक महामंडळाचे उपजिल्हाध्यक्ष किशोर दळवी, सुनील दळवी, ब नागेश खटले, सागर दळवी, रामराव लांडगे, हनुमंत राऊत, वैभव शिंदे, संतोष शिंदे, सतिश राऊत, बाळासाहेब बहिरे, रामकिसन वाघमारे, रोहित दळवी, केशव राऊत श्रीहरी झगडे याच्या सह तरुणांनी परिश्रम घेतले.

# ॲड सतिष शिंदे यांच्या पत्राद्वारे पाच हजार घरकुलांना मंजुरी

## जिल्ह्यासाठी २८००० हजार घरकुल मंजूर

बीड। प्रतिनिधी



मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून बीड जिल्ह्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील २८ हजार घरकुल उभारणीस मंजुरी देण्यात आली आहे. ना. अतुल सावे गृहनिर्माण व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री यांच्या माध्यमातून महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख ॲड सतिष शिंदे यांनी बीड जिल्ह्यासाठी पाच हजार घरकुलांना मंजुरी आणली . महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख ॲड सतिष शिंदे हे नामदार अतुल सावे यांचे अत्यंत विश्वासू असल्याने सावे यांनी एड. सतीश शिंदे यांच्या पत्राच्या आधारे त्यांना ५००० घरकुलाची मंजुरी दिली. बीड जिल्ह्यात इतक्या मोठ्या प्रमाणात एकाच वेळी घरकुल मंजूर करण्याची कदाचित ही पहिलीच वेळ असून जिल्ह्यातील २८ हजार गरजू नागरिकांचे स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे, याचा मला निश्चितच आनंद आहे. या निर्णयाबद्दल इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे यांचे ॲड सतिष शिंदे यांनी आभार मानले.

# जिल्हास्तरीय शालेय मैदानी स्पर्धेत सैनिकी विद्यालयाचे वर्चस्व!

बीड। प्रतिनिधी

जिल्हास्तरीय शालेय मैदानी स्पर्धेत सैनिकी विद्यालयाच्या खेळाडूंनी याही वर्षी वर्चस्व गाजवले असून १२ खेळाडूंची विभागीय शालेय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

जिल्हा क्रीडा कार्यालय मान्यतेने जिल्हास्तरीय शालेय मैदानी स्पर्धा सैनिकी विद्यालयाच्या मैदानावर पार पडली. १४ वर्षे मुलांच्या गटात साईनाथ म्हेत्रे , सुरेंद्र बिक्कड, ओंकार वायफळकर , रणवीर राऊत , महेश ढाकणे यांनी ४ बाय १०० रिले मध्ये प्रथम स्थान पटकावले. १७ वर्षाखालील गटात शिवराज सुर्वे याने १०० मीटर अडथळा शर्यती मध्ये प्रथम स्थान पटकावले तर १९ वर्षाखालील मुलांच्या गटात राष्ट्रीय खेळाडू प्रताप तुपे याने २०० मीटर धावणे मध्ये तर वैभव देशमुखे याने ४०० मीटर अडथळा शर्यतीमध्ये प्रथम स्थान पटकावले. ४ बाय १०० रिले गटात अरविंद पांढरे ,प्रताप तुपे, माऊली खांडे, मार्कड अनुराग यांनी प्रथमस्थान मिळवून दिले. क्रॉस कंट्री गटात सागर केळगंद्रे याने जिल्हा संघात विभागीय स्पर्धेसाठी स्थान मिळवले आहे. या सर्व खेळाडूंना डॉ.अविनाश बारगजे, मेघराज कोल्हे, विजयकुमार धारणकर यांचे मार्गदर्शन लाभले. संभाजीनगर येथे होणाऱ्या विभागीय शालेय मैदानी स्पर्धेसाठी हे सर्व खेळाडू पात्र ठरले आहेत. या विजयी खेळाडूंचे नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ भारतभूषण क्षीरसागर , उपाध्यक्षा डॉ. दीपा क्षीरसागर , डॉ. योगेश क्षीरसागर , डॉ. सारिका क्षीरसागर , डॉ.देशमाने सर , प्रा. डॉ. सुधाकर गुट्टे , सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य खोड, सर्व प्राध्यापक , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या आहेत.

# अध्यात्मिक सहवासाने मिळाले नवचैतन्य -राजेभाऊ फड



परळी। प्रतिनिधी

नवरात्रोत्सव निमित्त श्री क्षेत्र भगवानगड येथे आज राष्ट्रसंत भगवान बाबांच्या चरणी नतमस्तक झालो. बाबांच्या दर्शनाने व गडाच्या अध्यात्मिक सहवासाने नवचैतन्य प्राप्त झाले, अधिकाधिक गतीने सामाजिक व राजकीय कार्य करण्याची ऊर्जा मिळाली तसेच संतांच्या दर्शनाने पुढील काळातील वाटचालीला नवी दिशा प्राप्त झाली असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी व्यक्त केले. बुधवार दि.०९ ऑक्टोबर रोजी त्यांनी भगवान गडावर जाऊन राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या समाधीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर आपल्या भावना व्यक्त करत असताना ते बोलत होते.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी पक्षाचे नेते आणि कार्यकर्त्यांना सोबत घेत श्री क्षेत्र भगवानगड येथे जाऊन राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या समाधीचे दर्शन घेतले. तत्पूर्वी सकाळच्या सत्रात ते माजी आमदार स्व.रघुनाथराव मुंडे यांच्या समाधीस्थळी नतमस्तक झाले. त्यापुढे पांगरी येथील गोपीनाथ गडावर जाऊन स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या समाधीचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. तद्नंतर त्यांनी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या समाधीचे दर्शन घेतले व नंतर श्री क्षेत्र नारायणगड व गहिनीनाथ गड येथेही ते नतमस्तक झाले. नवरात्रोत्सव निमित्त राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी संतांच्या दर्शनासाठी दौरा केला. दर्शनानंतर आपल्या भावना व्यक्त करीत असतांना राजेभाऊ फड म्हणाले की, संतांच्या दर्शनाने नवचैतन्य आणि नवी ऊर्जा मिळाली. लोकसेवा माझ्या हातून घडावी यासाठी मी समाजकारण आणि राजकारणात आलो आहे. मी हाती घेतलेले जनसेवेचे व्रत अखंडपणे पुढे चालू राहावे यासाठी नवशक्ती मिळावी असे साकडे मी संतचरणी घातले असल्याचेही त्यांनी सांगितले. राजेभाऊ फड यांच्या आजच्या दौऱ्यात पक्षाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# युधाजित पंडितांच्या सर्कलनिहाय गाठीभेटी

## बदामराव पंडितांना आमदार करण्यासाठी मोर्चे बांधणी

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडी कडून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने माजी राज्यमंत्री बदामराव पंडित हे निवडणूक लढणार असून त्यांच्या पाठीशी मतदारांनी उभा राहावे आणि आशीर्वाद द्यावे यासाठी शिवसेना जिल्हा समन्वयक तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी अर्थाने बांधकाम सभापती युधाजित पंडित यांनी रेवकी-देवकी, तलवाडा, जातेगाव, सिरसदेवी, पाचेगाव या जिल्हा परिषद सर्कल मध्ये झंजावती दौरा करून राजकीय वातावरण ढवळून काढले आहे.



गेवराई विधानसभा मतदारसंघातून तीन वेळेस आमदार आणि एक वेळेस राज्याचे ग्रामविकास राज्यमंत्री म्हणून काम केलेले माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांना महाविकास आघाडी कडून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने उमेदवारी मिळाल्याचे स्पष्ट झाल्याने, त्यांच्या विजयासाठी बीड जिल्हा शिवसेना समन्वयक तथा जिल्हा परिषद चे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित यांनी दिनांक ५ ऑक्टोबर पासून गेवराई मतदार संघातील रेवकी, देवकी, तलवाडा, जातेगाव, सिरसदेवी, पाचेगाव या जिल्हा परिषद सर्कल मधील प्रत्येक गावात जाऊन प्रत्यक्ष मतदारांच्या बैठक आणि भेटी घेऊन संवाद साधला आहे. बदामराव पंडित यांनी गेल्या ३० वर्षापासून गोरगरीब सामान्य जनतेचे वैयक्तिक, कौटुंबिक, आरोग्य विषयक अनेक कामे केली आहेत. गोरगरिबांना कोणत्याही अडचणीच्या वेळी आपल्या मदतीला धावून येणाऱ्या नेत्याचं नाव विचारलं तर त्याच्यासमोर फक्त बदामराव पंडित हेच नाव येत. कारण बदामराव आबांनी कोणाचं वाईट केलेलं नाही किंवा कोणाचे नुकसानही केलेले नाही. आपल्याकडून होईल तितकं त्याचं काम करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासोबतच त्यांनी केलेले गावचे रस्ते, शाळा इमारती आणि प्रशासनाचा सुसज इमारती यासह गाव स्तरावर केलेल्या विविध विकासात्मक कामांची माहिती देऊन युधाजित पंडित यांनी सामान्य माणसांच्या सुखदुःखात सहभागी होणाऱ्या बदामराव पंडित यांना यावेळी आमदार म्हणून विधानसभेत पाठवा असे आवाहन केले आहे. त्यांच्या या दौऱ्याने गेवराई तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे. त्यांच्या समवेत या दौऱ्यात गेवराई नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष अमोल करांडे, पंचायत समिती माजी सदस्य महादेव औटी, कानिफनाथ नागरे, सरपंच भैय्यासाहेब नाईकवाडे, बदाम पौळ यांची प्रमुख उपस्थिती होती. या दौऱ्यात विविध गावचे सरपंच, उपसरपंच यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाल्याचे पाहायला मिळाले.

# बीड विधानसभा मतदार संघातील मुलभूत आणि जिव्हाळ्याच्या प्रश्नावर आ.संदीप क्षीरसागर,माजी आ.सय्यद सलीम यांचे राज्यपालांना निवेदन

## बीड पाणी पुरवठा, टुकूर (खांडेपारगाव) तलाव,बिंदुसरा नदीवरील बंधाऱ्याविषयी केल्या मागण्या

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल श्री.सी.पी.राधाकृष्णन हे बुधवार दि.९ ऑक्टोबर २०२४ रोजी बीडच्या दौर्यावर होते. ते बीड येथे आले असता आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी राज्यपाल महोदयांची भेट घेवून बीड मतदार संघातील मुलभूत आणि जिव्हाळ्याच्या असलेल्या विविध प्रश्नांवर चर्चा केली व निवेदन दिले.

बीड मतदार संघातील विविध प्रश्न अनेक काळापासुन प्रलंबित आहेत. याचा पाठपुरावा शासन दरबारी सातत्याने चालू असुनही हे प्रश्न सुटत नाहीत. आ.संदीप क्षीरसागर आणि माजी आ.सय्यद सलीम हे या विषयात निरंतर पाठपुरावा करत असतात. बीड शहरातील नागरिकांसाठी मुलभूत असलेला पाणी पुरवठ्याचा प्रश्न अनेक वेळा शासनाकडे पाठपुरावा केल्यानंतरही सुटला नाही. शेवटी मा.उच्च न्यालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये याचिका दाखल करून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी प्रयत्न केले. यावर मा.न्यायालयानेही या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेत शासनाला बीड शहराचा पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी आर्थिक निधीची तरतुद करा असे निर्देश दिले आहेत. परंतु अद्यापपर्यंत तरी या समस्ये बाबत शासनाने दखल घेतलेली नाही. तसेच मा.न्यायालयाच्या निर्देशाचे पालन शासनाकडून झालेले नाही. या सोबतच बीड मतदार संघातील बिंदुसरा नदीवरील बीड शहरासाठी पाणी पुरवठा करणे करिता निम्न पातळी बंधारा करणे बाबत कार्यकारी संचालक,गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विभाग,छत्रपती संभाजीनगर यांना उपसचिव,महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग यांनी दि.१०.११.२०२१ रोजी सदरील प्रक्रिया करण्याच्या मान्यतेसह





आदेशीत केलेले आहे. तसेच निम्न पातळी बंधारा कम पुल करणेसाठी कामाचे सर्वेक्षण होवून प्रस्ताव व संकल्पन प्रस्ताव मध्यवर्ती चित्र संघटना नाशिक यांच्याकडून सादर होवून तो प्रस्ताव मान्य देखिल करण्यात आलेला आहे. सदरील बंधार्यासाठी ९५ टक्के विश्वासर्हतेने ३.२३ दलघमी येवा उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र आहे. तसेच या प्रकल्पास आवश्यक ०.३५ दलघमी पाणी वापरामुळे कोणताही परिणाम दिसून येत नाही. तरी,मध्य गोदावरी खोर्यातील लवादानुसार पाणी वापर सुत्रानुसार प्रत्यक्ष पाणी वापर परगणित केल्यानुसार उपलब्ध होणार्या मंजुर २.८० अब्ज घनफुट (टीएमसी) शिल्लक पाण्यामधुन या बंधार्याकरिता विशेष बाब म्हणुन सिंचनासाठी (पिण्यासाठी) ०.३५ दलघमी पाणी वापर प्रस्तावित केलेला आहे. तसेच टुकूर (खांडेपारगाव ता.बीड) येथील साठवण तलाव प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेश सन २००३ रोजी पारीत झालेले आहेत. तत्कालीन वेळेला त्या प्रकल्पाची एकूण किंमत भुसंपादनासह १६ कोटी रूपये इतकी होती.आज ती किंमत किमान ३५० कोटी रूपयांच्या उपर जात आहे. आसपासच्या

◀◀ पान ३ वर

### राज्यपाल करू शकतात बीड शहराच्या पाणी प्रश्नासाठी तरतुद

बीड शहराचा पाणी प्रश्न अत्यंत गंभीर होत चालला आहे. पाणी आणि पुरवठ्यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा या दोन्ही मुलभूत गोष्टी उपलब्ध असूनही केवळ नगर पालिकेकडील थकीत वीज बिलाच्या अभावी बीड शहराला सुरळीत आणि पुरक प्रमाणात पाणी पुरवठा होत नाही. या बाबत आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी शासकीय आणि प्रशासकीयस्तरावर शर्थीचे प्रयत्न केले आहेत. परंतु यावर काही तोडगा निघाला नाही. शेवटी आ.क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मा.न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने नगर पालिकेकडील थकीत वीज बील भरणेसाठी तरतुद करा असे निर्देशही राज्य शासनाच्या नगरविकास विभाग व पाणी पुरवठा विभागाला दिले आहेत. परंतु अजुनही हा प्रश्न मार्गी लागला नाही. दरम्यान महामहिम राज्यपाल हे मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाचे प्रमुख आहेत. मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाची निर्मितीच मुळात मराठवाड्यातील विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी झालेली आहे. मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाकडे स्वतंत्र आर्थिक निधी उपलब्ध असतो. त्यामुळे बीड शहराच्या पाणी प्रश्नावर, नगर पालिकेकडील ३६ कोटी रूपये थकीत असलेले वीज भरून शहराचा पाणी पुरवठा सुरळीत करणेसाठी मा.महामहिम राज्यपाल महोदय तरतुद करू शकतात ही बाब लक्षात घेवून आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी या बाबत राज्यपाल महोदयांकडे मागणीही केली आहे.

# नूतन कार्यकारणीला कायम सहकार्य करणार–गणेश मोकाशे

मुंबई । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेच्या नवीन कार्यकारणीमध्ये सर्व तरुण पदाधिकारी आले असून आगामी दोन वर्षांमध्ये परिषदेचे काम अधिक जोमाने होईल असा विश्वास व्यक्त करताना पुणे विभागाचे सचिव तथा दैनिक लोकतंत्रचे संपादक गणेश मोकाशे यांनी या कार्यकारणीला कायम सहकार्य करण्याची ग्वाही दिली .यावेळी त्यांनी सर्वांचे अभिनंदन केले.




मुंबई येथे दि. ९ ऑक्टोबर रोजी प्रेस क्लबच्या सभागृहात झालेल्या मराठी पत्रकार परिषदेच्या सर्वसाधारण सभेत नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यावेळी विश्वस्त पदी शरद पाबळे, अध्यक्षपदी मिलिंद आष्टीवकर, कार्याध्यक्षपदी शरद काटकर, सरचिटणीस पदी प्रा. सुरेश नाईकवाडे तर कोषाध्यक्षपदी मन्सूर भाई शेख यांची नियुक्ती करण्यात आली .याचवेळी उपाध्यक्ष आणि इतर पदाधिकाऱ्यांच्या निवडी ही लवकरच घोषित करण्याची घोषणा मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी केली. यावेळी मनोगत व्यक्त करताना मराठी पत्रकार परिषदेचे पुणे विभागाचे सचिव गणेश मोकाशी यांनी नवीन कार्यकारीणीला सदैव सहकार्य असून ही तरुण कार्यकारणी अधिक जोमाने काम करील आणि पुढील दोन वर्षात मराठी पत्रकार पत्रकार परिषदेचे काम मोठ्या प्रमाणात वाढेल. असा विश्वास व्यक्त केला यावेळी बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके यांनीही नवीन कार्यकारणीला शुभेच्छा दिल्या.



# अरणवाडी साठवण तलावात धनगर युवकांचे अर्धनग्न आंदोलन

धारूर । प्रतिनिधी

धनगर समजला एसटी मधून आरक्षण मिळावे म्हणून विविध आंदोलने सुरू आहेत या मागण्यांकडे दुर्लक्ष करत आहे. पंढरपूर येथील आंदोलन कर्त्यांना पंधरा दिवसात धनगर आरक्षणाचा अध्यादेश काढण्याचे आश्वासन दिले होते ते आश्वासन पूर्ण केल्यामुळे धनगर समाजाच्या तरुणांनी धारूर तालुक्यातील आरणवाडी येथील साठवण तलावात अर्ध लग्न आंदोलन करत शासनाचा निषेध केला व तहसीलदार यांना मागण्यांची निवेदन दिले.

राज्यातील धनगर समाजाचा एसटी प्रवर्गामध्ये समावेश करावा या मागणीसाठी पंढरपूर येथील राज्यव्यापी मरण उपोषण करण्यात आले होते या उपोषणकर्त्यांना शासनाने पंधरा दिवसाच्या आत आरक्षणाचा अध्यादेश काढू असे आश्वासन दिले होते या आश्वराची शासनाने पूर्तता न केल्यामुळे राज्यातील धनगर समाज शासनाविरोधात आंदोलन करत आहे याचाच एक भाग म्हणून धारूर तालुक्यातील धनगर समाजाच्या तरुणांनी शासनाचा निषेध म्हणून आरणवडी येथील साठवण तलावात अर्ध नग्न होऊन शासनाचा निषेध केला येणाऱ्या निवडणुकीत सरकारला धडा शिकवणार असल्याच्या तीव्र भावना धनगर समाजाच्या युवकांनी व्यक्त केल्या या आंदोलनात धनगर समाजाच्या तरुणांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला.

# भगवान भक्ती गडावरील दसरा मेळाव्याची तयारी पूर्ण

## गुढी उभारून आ.पंकजाताई मुंडे यांचे होणार स्वागत

बीड । प्रतिनिधी

सावरगाव घाट येथील भगवान भक्ती गडावर आमदार पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थित होणाऱ्या भव्य दसरा मेळाव्याची तयारी पूर्ण झाली असून आ.पंकजाताई मुंडे यांचे सावरगाव घाट गावकरी गुढ्या उभारून आणि भव्य मिरवणुकीने स्वागत करणार आहेत.

लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांनी समाजातील वंचित, शोषित, दुर्लक्षित, बहुजनांच्या प्रश्नावर आवाज उठवणारे व्यासपीठ दसरा मेळाव्याच्या माध्यमातून उभारले होते .सावरगाव घाट हे संतश्रेष्ठ भगवान बाबा यांची जन्मभूमी आहे. स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांनी स्थापन केलेल्या विचार



पिठावर बहुजनांच्या प्रश्नावर आवाज उठवणारे अनेक व्यक्ती आजपर्यंत आले आहेत. स्वर्गीय मुंडे यांच्यानंतर आमदार पंकजाताई मुंडे यांनी हा वारसा पुढे चालवला ज्या घटकांचा कोणी वाली नाही. अशा घटकांसाठी हा मेळावा घेतला जातो याचे कोणाला निमंत्रण नसते. या ठिकाणी सर्वांचे स्वागत केले जाते. भगवान भक्ती गडावर होणाऱ्या दसरा मेळाव्याच्या तयारीसाठी संयोजन समितीचे सर्व कार्यकर्ते सहभागी होणार असल्याची माहिती समितीचे संयोजक सर्जेराव तांदळे, प्रा. पी टी चव्हाण माधवराव निर्मळ ,अण्णासाहेब मतकर राजाभाऊ मुंडे नवनाथ शिराळे, विक्रांत हजारी देविदास नागरगोजे, अशोक लोढा ,सलीम जहांगीर, चंद्रकांत फड , सौ.संगीता धसे,डॉ.लक्ष्मण जाधव ,इरशाद शेख कल्याण आबुज ,किरण बांगर, दीपक मुंडे, शांतिनाथ डोरले ,अनिल चांदणे, विलास बामणे,, ओम प्रकाश गिरी, दादासाहेब ननवरे आदींची प्रमुख उपस्थिती या ◀◀ पान ३ वर



# लखलखत्या दिव्यांनी उजाळला बेलवाडी परिसर

परळी । प्रतिनिधी

सर्वत्र अंधार,शेकडो महिलांची उपस्थिती अन्? लखलखत्या दिव्यांनी संपुर्ण बेलवाडी परिसर प्रकाशमान झाला.अरोही स्टाईल स्टुडीओ च्या संचालिका सौ.श्रध्दाताई हालगे फुलारी यांच्या वतिने आयोजीत दांडीया महोत्सवात पुजा ताट साहित्य स्पर्धेत महिलांनी सहभाग नोंदवत परिसर आरतीच्या दिव्यांनी उजाडुन सोडला.

प्रभु वैद्यनाथाच्या पायथ्याशी असलेल्या बेलवाडी येथे सौ.श्रध्दाताई हालगे-फुलारी यांच्या वतिने नवरात्रोत्सवात नारीशक्ती दांडीया ◀◀ पान ३ वर

# पत्रकारांसाठी महामंडळ म्हणजे फक्त निवडणूक जुमला, एस.एम.देशमुख यांची जोरदार टीका

मुंबई । प्रतिनिधी

'पत्रकार संरक्षण कायद्याचं नोटिफिकेशन काढून राज्यात पत्रकार संरक्षण कायदा लागू करण्यास टाळाटाळ केली जात आहे. पत्रकार पेन्शन योजनेसाठी अनेक ज्येष्ठ पत्रकारांचे अर्ज तांत्रिक दोष काढून हेतूत: प्रलंबित ठेवले जात आहेत. पेन्शनची रक्कम ११ हजारावरून २० हजार करण्याची घोषणा तर केली गेली. मात्र त्याची अंमलबजावणी होत नाही. मजेठिया वेतन आयोगाची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ केली जात आहे. तरी दुसरीकडे या सर्व पत्रकारांच्या प्रश्नांची उपेक्षा करून सरकार आता पत्रकारांसाठी महामंडळ स्थापन करायला निघालं आहे. त्यामुळे हा फक्त निवडणूक जुमला आहे, असा घणाघात मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी केला आहे.



पत्रकारांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. यावरून मात्र एस.एम.देशमुख यांनी जोरदार टीका केली आहे. ते म्हणाले, 'सरकारकडून अधिस्वीकृती पत्रिका धारकाच्या रेल्वेसह अनेक सवलती रद्द केल्या गेल्या आहेत. साप्ताहिकं आणि छोटी दैनिके बंद पडतील, असे वृत्तपत्र धोरण आखले जात आहे. चांगल्या युट्यूब चँनल्सना सरकारी जाहिराती सुरू करा, त्यांना अधिस्वीकृती द्या, या मागण्यांकडे दुर्लक्ष केलं जात आहे. तर दुसरीकडे पत्रकारांसाठी महामंडळ स्थापन करण्याची घोषणा केली जातेय. मुळात पत्रकारांचे प्रश्न सुटले पाहिजेत, असं सरकारला मुळी वाटतंच नाही,' असेही ते म्हणाले.

'महामंडळ स्थापन करून पत्रकारांचे प्रश्न सुटतील असं आम्हाला वाटत नाही. विविध क्षेत्रातील लोकांसाठी अगोदरच राज्यात ५५ महामंडळं आहेत. या महामंडळाची काय अवस्था आहे? त्यातून किती लोकांचे कोट कल्याण झाले? हे सर्व पाहता महामंडळाने पत्रकारांचे होणार आहे? ''पांढरे हत्ती'' अशीच या सर्व ◀◀ पान ३ वर

# डॉक्टर पतीला मारहाण व दरोड्यातील दोन आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**येथील एका डॉक्टरच्या पतीला मारहाण आणि दरोडा प्रकारणातील दोघा आरोपींना अंबाजोगाई जिल्हा व सत्र न्या. श्रीमती घरत यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला. या प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड.कमलकिशोर पारिख यांनी कामकाज पाहिले.**




या प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, १९ सप्टेंबर २०२४ रोजी फिर्यादीच्या लोखंडी सावरगाव रोडवरील पाण्याच्या टाकीचे काम चालू होते. यावेळी रात्री १२ वाजता तिथे आरोपी कैलास नवनाथ पडुळे, रंजीत सावंत व इतर सहा आरोपी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी त्या साईटवरील जेसीबीचे ब्रेकर व काही लोखंड चोरण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यावेळी तेथील वॉचमनने या आरोपींना चोरी करताना पाहिले व त्याने तत्काळ फिर्यादीला फोन केला. फिर्यादी घटनास्थळी

◀◀ पान ३ वर

# लुगडे महाराज व केशव साबळेवर झालेल्या खोट्या ॲट्रॉसिटी विरोधात हजारो नागरिक रस्त्यावर

परळी । प्रतिनिधी

परळी शहरातील जलालपूर भागात साबळे कुटुंबातील पुरुषांसह महिला व लहान मुलावर झालेला भ्याड हल्ला व लुगडे महाराज, राधाकिसन साबळे व केशव साबळे यांच्यावर झालेली खोटी अट्रोसिटी च्या विरोधात हजारो नागरिकांनी रस्त्यावर उतरून परळी पोलीस स्टेशनच्या निरीक्षक यांच्या मार्फत बीडचे पोलीस अधीक्षक व अंबाजोगाईचे पोलीस उपअधीक्षक यांना विशेष चोकशी करून न्याय द्यावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. व खोट्या गुन्ह्याचा निषेध व्यक्त केला. परळीत मतदारसंघात सातत्याने खोट्या गुन्ह्यांमध्ये खूप



वाढ झाली असून सामाजिक, राजकीय क्षेत्रातील विविध लोकांवर राजकीय सुडबुद्धीने जाणीवपूर्वक हेतू पुरस्सर खोटे गुन्हे दाखल करून त्यांना अडकवण्याचा प्रयत्न वारंवार घडत आहे. याचाच एक भाग राजकीय द्वोषापोटी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शरदचंद्र पवार पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांच्यावर झालेली खोटी अट्रोसिटीची घटना घडली त्यावेळेला लुगडे महाराज हे परळी

◀◀ पान ३ वर

# सावीज् ब्युटीशॉपीने हजारो महिलांना अर्थिक सक्षम बनवले –जयश्री विधाते




बीड । प्रतिनिधी

शहरातील रामकृष्ण लॉन्स येथे सावीज्? ब्युटी शॉपी यांच्या तर्फे दांडीया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात बीड शहरातील अनेक ब्युटीशियन आणि मेकअप आर्टिस्ट यांनी सक्रिय सहभाग नोंदविला होता, यांच्या प्रयोजनातुन सुमारे पन्नास बक्षीसांची लयलुट करण्यात आली होती. महोत्सवात हाजारो महीला आणि मुलींनी सहभागी होत नृत्य संगीत दांडीयाचा आनंद लुटला महत्वाचे म्हणजे विविध सखी मंच, लेडीज क्लब आणि सक्रिय महीला संघांनी उत्साहात स्वयम्? प्रेरणेने सहभागी होत कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले, या कार्यक्रमाचे चोख ◀◀ पान ३ वर

# शहरात विकासासाठी करोडो रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला –अर्जुनराव खोतकर

जालना । प्रतिनिधी

जालना शहर महापालिका झाल्यामुळे शहर विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध मिळू लागला असून भाग्यनगरच्या विकासासाठी आपण करोडो रुपयाचा निधी विविध विकास कामासाठी मा.मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे , उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस व अजित पवार यांच्या माध्यमातून मंजूर करून घेतला आहे .भाग्यनगरचा डीपी रोड व अण्णाभाऊ साठे पुतळा ते मुक्तेश्वर द्वारपर्यंतचा हा मुख्य रस्ता सीसी ट्रिमिक्स पद्धतीने बांधकाम व्हावे ,पुतळा ते मिसाळ टावर पर्यंतच्या भुमिगत नाला व सिमेंट रोड हवा अशी या भागाचे



नगरसेवक पांगारकर,व रहिवासी नागरिकांची सततची मागणी होती. त्यांचा माझ्याकडे सततचा या कामासाठी पाठपुरा होता. त्यांच्या मागणीची दखल घेऊन मी मा. मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्याकडे पाठपुरावा केला व ही मागणी ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# कल्याणीनगर अपघात प्रकरण; अल्पवयीन मुलाला जामीन देणारे जेजेबीचे दोन सदस्य बडतर्फ

पुणे । प्रतिनिधी

पबमध्ये मद्यपान करून महागडी मोटार सुसाट चालवत दोघांच्या मृत्यूस जबाबदार ठरलेल्या अल्पवयीन मुलाला वाहतूक सुरक्षिततेवर तीनशे शब्दांचा निबंध लिहिण्यास सांगून तत्काळ जामीन देणाऱ्या बाल न्याय मंडळातील (जेजेबी) दोन सदस्यांना बडतर्फ करण्यात आले आहे. राज्य शासनाने याबाबतची अधिसूचना काढून पदाच्या अधिकाराचा गैरवापर केल्याचा ठपका ठेवत ही कारवाई केली आहे.

डॉ. लक्ष्मण नेमा धनवडे आणि कविता तुळशीराम थोरात अशी या सदस्यांची नावे आहेत. कल्याणीनगर अपघात प्रकरणातील अल्पवयीन मुलाला जामीन मंजूर करताना जेजेबीच्या सदस्यांकडून पुष्कळ चुका राहिल्या आहेत, असा अहवाल या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीने सादर केला होता. त्यानुसार



सदस्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांना चुकांबाबत स्पष्टीकरण देण्याचा आदेश दिला होता.

सदस्यांचा त्यांचा खुलासा आल्यानंतर आयुक्तालयाने त्यांच्या खुलाशासह स्वतंत्र अहवाल राज्य सरकारकडे पाठविला होता. महिला व बाल विकास विभागाचे उपसचिव आ. ना. भोंडवे यांनी याबाबत अधिसूचना काढली आहे.

चौकशीतून काय समोर आले होते

मंडळाच्या निर्णयाबाबत चौकशी करण्यासाठी पाच अधिकाऱ्यांची समिती स्थापन केली होती. त्या समितीने शंभरहून अधिक पानांचा अहवाल महिला व बाल कल्याण आयुक्तालयाकडे पाठविला होता. अल्पवयीन मुलाला जामीन देताना बाल न्याय मंडळातील एका सदस्याने भूमिका मांडली होती.

ती भूमिका न्याय मंडळासमोर ठेवल्यानंतर दुसऱ्या सदस्याने त्यावर शिक्कामोर्तब केले. त्यामुळे एक सदस्य दोषी नाही तर दुसरा सदस्यही दोषी आहे. मंडळाने निर्णयादरम्यान पुराव्यांकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून आले. तक्रारीतील माहिती विचारात घेतली नाही, अशा अनेक त्रुटी आढळल्या होत्या. त्याचा अहवालात उल्लेख करण्यात आला आहे.

महिला व बाल विकास आयुक्तालयाकडून दोन्ही सदस्यांची चौकशी करण्यात आली होती. त्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात आला होता. त्यानुसार राज्य सरकारने ही कारवाई केली आहे.

– डॉ. प्रशांत नारनवरे, आयुक्त, महिला व बाल कल्याण विभाग

# मानसिक आरोग्य व्यवस्थापन काळाची गरज –प्रा.बाबासाहेब पवळ

पिंपरी । प्रतिनिधी

आजच्या या धकाधकीच्या आणि स्पर्धेच्या युगात माणूस आपल्या अपूर्ण स्वप्नांच्या पूर्ततेसाठी अविरतपणे धावतो आहे. मात्र हे धावणे त्याला सर्वच पातळ्यांवर समाधानी ठेवू शकत नाही. त्यामुळे मानसिक आरोग्य राखणे हे सर्वांपुढील आव्हान आहे, असे प्रतिपादन मानसशास्त्र विभाग प्रमुख प्रा. बाबासाहेब पवळ यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात '१० ऑक्टोबर जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त' आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

पुढे ते म्हणाले की, आपल्या क्षमतेनुसार स्वप्न पाहणे, त्याच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करणे, आत्मविश्वास जागृत ठेवणे, सकारात्मक राहणे, अपयश पचविण्याची क्षमता ठेवणे, सकारात्मक लोकांच्या सहवासात राहणे आणि प्रामाणिकपणा, नम्रता, सत्यता, सोज्वळता, अहिंसेवर भर दिल्यास मानसिक आरोग्य संतुलित राहण्यास मदत होते.




सदर प्रसंगी मानसिक आरोग्य व्यवस्थापन संदर्भात चित्रपट दाखविण्यात आला. कार्यक्रमास कला शाखा प्रमुख डॉ. पांडुरंग भोसले, डॉ. वैशाली खेडकर, प्राध्यापक, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन व उपस्थितांचे आभार डॉ. शितल जाधव यांनी मानले.

# सणसवाडीच्या ग्रामपंचायत सदस्याचा अपघाती मृत्यू; परिसरात हळहळ

शिरुर । प्रतिनिधी

सणसवाडी ता. शिरुर येथील ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय हरगुडे यांचे काही दिवसांपूर्वी अपघाती निधन झालेले असताना नुकतेच निकिता हरगुडे या ग्रामपंचायत सदस्या युवतीचे अपघाती निधन झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.




दत्तात्रय हरगुडे हे पायी रस्ता ओलांडत असताना समोरून आलेल्या वाहनाची धडक बसून झालेल्या अपघातात जून २०२४ मध्ये निधन झाले असून नुकतेच ६ ऑक्टोबर रोजी सणसवाडी ग्रामपंचायत सदस्य निकिता हरगुडे हे पुणे नगर महामार्गावरील कल्याणी फाटा येथे कंपनीमध्ये जाण्यासाठी रस्ता ओलांडत असताना निधन झाले.अहमदनगर बाजूने पुणेच्या दिशेने चाललेल्या दुचाकीची निकिताला धडक बसून निकिता रस्त्यावर पडल्याने तिच्या डोक्याला मार लागल्याने तिच्यावर पुण्यातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु असताना आज उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला. तर ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय हरगुडे यांचा रस्ता ओलांडत असताना झालेल्या अपघातात मृत्यू झालेला असताना चार महिन्यात पुन्हा ग्रामपंचायत सदस्य युवतीचा त्याच प्रकारे अपघात होऊन ममृत्यू झाल्याने परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

# धक्कादायक! २०० किलो कोकेन जप्त, सुमारे २ हजार कोटींचा माल हस्तगत, मोठ्या ड्रग रॅकेटचा पर्दाफाश

मुंबई । प्रतिनिधी

दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने दिल्लीतून २ हजार कोटी रुपयांचे कोकेन जप्त केले आहे. सुमारे २०० किलो ड्रग्ज जप्त करण्यात आले आहेत. दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने रमेश नगर भागातील एका गोदामातून ते जप्त केले. यासह आतापर्यंत ७ हजार कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले आहेत.

दुबईत उपस्थित भारतीय नागरिक वीरेंद्र बसोया याचे नाव आंतरराष्ट्रीय सिंडिकेटचा मास्टरमाईंड म्हणून समोर आले आहे. बसोयाला यापूर्वीच भारतात ड्रग्ज प्रकरणात अटक करण्यात आली होती. मात्र जामीन मिळाल्यानंतर तो दुबईला गेला आणि आंतरराष्ट्रीय ड्रग्ज कार्टेलचा मोठा माफिया बनला. ५ हजार कोटी रुपयांच्या ड्रग्ज सिंडिकेटचा मास्टरमाईंड आणि मुख्य आरोपी तुषार



गोयल आणि वीरेंद्र बसोया हे जुने मित्र असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

बसोयानेच तुषारला ड्रग्जच्या नात्यात स्वत:शी जोडले होते. बसोयाने कोकेनच्या डिलिव्हरीच्या बदल्यात तुषारला प्रत्येक खेपेमागे ३ कोटी रुपये देण्याचा करार केला होता. दुबईतील बसोया यांनी या सिंडिकेटशी संबंधित यूकेमध्ये उपस्थित असलेल्या जितेंद्र गिलला भारतात जाण्यास सांगितले होते. यानंतर जितेंद्र गिल ड्रग्ज डीलसाठी तुषारला भेटण्यासाठी यूकेहून दिल्लीला आला. जिथे तुषारने त्याला पंचशील परिसरातील एका हॉटेलमध्ये राहायला लावले. यानंतर दोघेही ड्रग्ज खरेदी करण्यासाठी गाझियाबाद आणि हापूरला पोहोचले.

मुंबईत कोकेनचा पुरवठा करणाऱ्या व्यक्तीचीही ओळख दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने केली आहे. या संदर्भात मुंबईतील संभाव्य ठिकाणांवर छापे टाकण्यात येत आहेत. वीरेंद्र बसोया हे दुबईतील कोकेन डीलशी बऱ्याच काळापासून संबंधित असल्याचे सांगण्यात येत आहे. वीरेंद्र बसोयाबाबतचे इनपुट आंतरराष्ट्रीय एजन्सींसोबत शेअर करण्यात आले आहेत जेणेकरून त्याला दुबईत पकडता येईल. वीरेंद्र वसोवाचा दाऊद टोळीशी (डीकंपनी) संबंधांचाही तपास सुरू आहे.

बसोया यांचे नाव ड्रग्ज सिंडिकेटमध्येही आले होते. ज्याने गेल्या वर्षी दिल्लीत टाकलेल्या छाप्यात ३ हजार कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त केले होते. पुणे पोलिसांनी दिल्लीतील पिलांजी गावात बसोयावर छापाही टाकला होता. मात्र पोलीस येण्यापूर्वीच तो पळून गेला होता. बसोया यांनी गेल्या वर्षी दिल्लीतील एका आलिशान फार्महाऊसमध्ये यूपीच्या माजी आमदाराच्या मुलीशी आपल्या मुलाचे लग्नही लावले.



# एमएनजीएल गॅस कनेक्शन बंद करण्याच्या बहाण्याने महिलेची पावणेदहा लाखांची फसवणूक

पुणे – एमएनजीएल गॅस कनेक्शन बंद करण्याच्या बहाण्याने एका महिलेची पावणेदहा लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी सिंहगड रस्ता पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी एका महिलेने (वय ५८, रा. गणेशनगर, धायरी) पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सायबर चोरट्यांनी फिर्यादी महिलेला मोबाईलवर तुम्ही गॅसचे बिल न भरल्यास कनेक्शन बंद करू, असा संदेश पाठविला. त्यावर महिलेने त्या मोबाईल क्रमांकावर एमएनजीएलच्या कथित अधिकाऱ्याशी संपर्क साधला. त्यावेळी त्याने महिलेला तुम्हाला व्हॉटसपवर पाठविलेली एपीके प डाऊनलोड करा, असे सांगितले. महिलेने ते प डाऊनलोड केल्यानंतर डेबिट कार्डची माहिती भरण्यास सांगितली. त्यानंतर ओटीपी विचारून महिलेच्या बँक खात्यातून १७ वेळेस बँक व्यवहार करून नऊ लाख ८० हजार रुपये परस्पर काढून घेतले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने सिंहगड रस्ता पोलिस ठाण्यात तक्रार दिली.

# जिजामाता महिला सहकारी बँकेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षांची बिनविरोध निवड

पुणे । प्रतिनिधी

जिजामाता महिला सहकारी बँक लि. पुणेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदांची निवडणूक ७ ऑक्टोबर २०२४ रोजी बँकेच्या मुख्य कार्यालयातील सुशीलानंद सभागृहात पार पडली. या निवडणुकीचे अध्यक्षस्थानी पुणे शहरातील सहकारी संस्थांचे जिल्हा उपनिबंधक श्री. संजय राऊत होते.



या निवडणुकीत सौ. सुजाता प्रदीप जगताप यांची अध्यक्ष आणि सौ. पूजा मयुर वांजळे यांची उपाध्यक्षा म्हणून बिनविरोध निवड झाली. बँकेने आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी २.८२ कोटी रुपयांचा नफा कमावला आहे, तर बँकेचे नेट एनपीए (नॉन परफॉर्मिंग ॲसेट्स) केवळ ०.३१% आहे. याशिवाय बँकेची ५१वी वार्षिक सर्वसाधारण सभा ५ सप्टेंबर २०२४ रोजी पार पडली होती. बँकेच्या ठेवी ४०० कोटी, कर्ज व्यवहार २५० कोटी, भागभांडवल १४.७४ कोटी, निधी ३९.३९ कोटी असून बँकेने १६७.३३ कोटींची गुंतवणूक केली आहे. तसेच, बँकेस अ वर्गाचे ऑडिट प्रमाणपत्र मिळाले आहे. बँकेने आपल्या सभासदांना ८% लाभांश आणि सेवकांना ६% सानुग्रह अनुदान जाहीर केले आहे. बँकेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ १७ जून २०२४ रोजी अण्णाभाऊ साठे सभागृहात मोठ्या दिमाखात पार पडला होता. महत्वाचे म्हणजे, जिजामाता महिला सहकारी बँकेला २८ सप्टेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशन लि.मुंबई यांच्याकडून २०२३-२४ या आर्थिक वर्षातील सर्वोत्कृष्ट महिला सहकारी बँकेचा पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार केंद्रीय सहकार व हवाई उड्डाण राज्यमंत्री मा. श्री. मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या पुरस्काराचा स्वीकार माजी अध्यक्षा सौ. रत्नमाला म्हस्के, संचालिका सौ. सुजाता जगताप, सौ. पूजा वांजळे, सौ. मंगला भोजने, सौ. सुनीता शितोळे, सौ. सुरेखा शेलार, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य श्री. संग्राम गायकवाड आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. उमाकांत मुंगी यांनी केला.

# पालिकेच्या कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड

पुणे : महापालिकेतील सुमारे १८ हजार कर्मचारी आणि अधिकार्यांना दिवाळीपूर्वी ८.३३ टक्के बोनस आणि सानुग्रह अनुदानाची रक्कम बँक खात्यात जमा होणार आहे. याबाबत वित्त व लेखा विभागाने परिपत्रक काढल्याने कर्मचारी व अधिकार्यांची दिवाळी गोड होणार आहे.



महापालिकेकडून दरवर्षी महापालिका अधिकारी, कर्मचारी, महापालिकेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना दिवाळीनिमित्त सानुग्रह अनुदान आणि बोनस दिला जातो. यावर्षी महापालिकेच्या अंदाजपत्रकात यासाठी १२५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. लेखा व वित्त विभागाने काढलेल्या परिपत्रकात १८ ऑक्टोबरपर्यंत सर्व बिले तपासून घेण्याचे आदेश विभागप्रमुखांना दिले असून, दिवाळीपूर्वी ही रक्कम बँक खात्यात जमा केली जाणार आहे. २०२३-२४ च्या मूळ वेतन, महागाईभत्ता यावर ८.३३ टक्के आणि २३ हजार रुपये सानुग्रह अनुदान उपस्थितीच्या प्रमाणात दिले जाणार आहे. गेल्या वर्षभरात संबंधित सेवकांची प्रत्यक्ष हजेरी किमान १८० दिवस असणे आवश्यक आहे, अशांना ही रक्कम दिली जाणार आहे.

# विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी एसएफआयचे बेमुदत धरणे सुरू

मंचर । प्रतिनिधी

अर्धे शैक्षणिक वर्ष संपत आले, तरीही विद्यार्थी वसतिगृहाविना असल्याकारणाने एसएफआयचे घोडेगाव तालुका आंबेगाव येथील आदिवासी प्रकल्प कार्यालयासमोर उपोषण सुरू करून शासनाचे लक्ष वेधले आहे.

आश्रमशाळांच्या पायाभूत सुविधा, विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेश मिळावा. इत्यादी कारणांसाठी स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय)च्या वतीने सोमवार, दि. ७ ऑक्टोबरपासून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या बाहेर बेमुदत उपोषण आंदोलन सुरू केले. वसतिगृहासाठी अर्ज केलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेश देण्यात यावा, एकलव्य कुशल पोर्टलवर एमएससीआयटी, टॅली, टाइपिंग जेईई, नीट या कोर्सचा समावेश करण्यात यावा. आश्रमशाळा व वसतिगृहातील



पायाभूत सुविधांचा प्रश्न तात्काळ सोडविण्यात यावा. या व अन्य मागण्यांसाठी आंदोलन सुरूच आहे.दि. ६ ऑगस्ट रोजी संघटनेने घोडेगाव प्रकल्प कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन केले होते.

या आंदोलनास प्रकल्प अधिकारी यांनी समस्या सोडविण्याचे लेखी आश्वासन दिले होते. या घटनेला महिना होत आलेला आहे. तसेच दि.२९ व ३० ऑगस्ट रोजी संघटनेने नाशिक आयुक्त कार्यालय नाशिकच्या समोर देखील उलगुलान मोर्चा केला होता.

या आंदोलनास देखील आयुक्त कार्यालयाने लेखी आश्वासन दिलेले आहे. तसेच सबंधित कार्यालयांना पत्राद्वारे वसतिगृह प्रवेश प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी निर्देश देखील दिलेले आहेत. संघटनेने महिनाभर सातत्याने पाठपुरावा करत आहेत. तरी देखील रिक्त जागा असून देखील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत नाहीत. यामुळे संघटनेच्या वतीने बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. या धरणे आंदोलनाचे नेतृत्व एसएफआय महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सोमनाथ निर्मळ, पुणे जिल्हा अध्यक्ष दीपक वालकोळी, सचिव नवनाथ मोरे, सहसचिव समीर गारे, संदीप मरभळ, निशा साबळे, निकिता मेचकर, बाळकृष्ण गवारी, राजू शेळके, संस्कृती गोडे, समीक्षा केदारी आदी करत आहेत.

# मोबाईलवर बोलताना तरुणीला डंपरची धडक ; तरुणीचा जागीच मृत्यू

पुणे : भरधाव डंपरच्या धडकेत पादचारी तरुणी मृत्युमुखी पडल्याची घटना कर्वे रस्त्यावर परिसरात बुधवारी (दि. ९) सकाळी घडली. तरुणी मोबाईलवर बोलत दुभाजक ओलांडत होती, त्या वेळी भरधाव डंपरने तिला धडक दिली. आरती सुरेश मनवाने (वय २३, रा. एरंडे हॉस्टेल, भेलकेनगर, कोथरूड) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणीचे नाव आहे.

आरती मूळची अमरावतीची आहे. ती शहरातील एका खासगी कंपनीत नोकरी करते. अपघाताची माहिती तिच्या कुटुंबीयांना कळविण्यात आली आहे. तिचे कुटुंबीय पुण्याकडे रवाना झाले आहे. अपघातानंतर डंपरचालक पसार झाला होता, पण पोलिसांनी त्याला अटक केली. सकीम अन्सारी (रा. उत्तर प्रदेश) असे त्याचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती अलंकार पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक संगीता रोकडे यांनी दिली.आरती बुधवारी सकाळी अकराच्या सुमारास नेहमीप्रमाणे कामावर निघाली होती. कर्वे रस्त्यावरील दामोदर व्हिला सोसायटीकडून ती कोथरूडमधील बसस्थानककडे जात होती. ती दुभाजकावर चढून रस्ता ओलांडत होती. त्या वेळी ती मोबाईलवर बोलत होती. समोरून भरधाव वेगाने आलेला डंपर तिच्या नजरेस पडला नाही. डंपरच्या चाकाखाली ती चिरडली गेली. तिचा जागीच मृत्यू झाला.

वाहनचालकांनी डंपरचा पाठलाग करून थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र, डंपरचालक तेथून पसार झाला. यानंतर पोलिसांनी त्याला शोधून अटक केली. अपघाताची माहिती मिळताच अलंकार पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुनीता रोकडे आणि पोलिस कर्मचार्यांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघातानंतर कर्वे रस्ता परिसरातील वाहतूक काही वेळ विस्कळीत झाली होती. परंतु, वाहतूक पोलिसांनी वाहतूक सुरळीत केली.

रस्ता ओलांडतांना मोबाईलचा वापर जिवावर

शहर, परिसरात मोठ्या संख्येने परगावातील विद्यार्थी शिक्षणासाठी स्थायिक झाले आहेत. वाहन चालविताना अनेक जण मोबाईलवर संभाषण करतात. अनेक जण मोबाईलवर गप्पा मारत रस्ता ओलांडतात. मोबाईलवर बोलत रस्ता ओलांडणे, तसेच वाहन चालविताना मोबाईलचा वापर केल्याने गंभीर, तसेच किरकोळ स्वरूपाचे अपघात घडतात. कर्वे रस्त्यावर बुधवारी सकाळी डंपरच्या धडकेत तरुणीचा मृत्यू झाला. तरुणी मोबाईलवर बोलत रस्ता ओलांडत होती. दुभाजकावर चढून ती रस्ता ओलांडत असताना तिला डंपरने धडक दिली.

कर्वे रस्ता मृत्यूचा सापळा

कर्वे रस्ता गजबजलेला रस्ता आहे. दिवसा, तसेच रात्रीही या रस्त्यावर वाहनांची वर्दळ असते. कर्वे रस्त्यावरील रसशाळा चौकात १९ ऑगस्ट रोजी सायकलस्वार निवृत्त कृषी अधिकारी सुनील भास्करराव देशमुख (वय ६०, रा. निको गार्डन, विमाननगर) यांचा डंपरच्या धडकेत मृत्यू झाला. रससाळा चौकात जून महिन्यात जलसंपदा विभागातील निवृत्त अधिकारी कृष्णा गणपती देवळी (वय ६७, रा. कोथरूड) यांचा मृत्यू झाला. ९ सप्टेंबर रोजी रात्री नऊच्या सुमारास मद्याच्या नशेत असलेल्या टेम्पोचालकाने सहा वाहनांना धडक दिल्यची घटना घडली होती. अपघातात दुचाकीवरील सहप्रवासी महिलेचा मृत्यू झाला होता.

# बोपदेव घाट बलात्कार प्रकरणी तपास शून्य



पुणे । प्रतिनिधी

बोपदेव घाटातील सामूहिक बलात्कार प्रकरणात पोलिसांकडून सखोल तपास करण्यात येत आहे. तसेच बोपदेव घाटात नागरिकांना अडवून लूटमार तसेच फिरायला येणाऱ्या तरुणीचा विनयभंग प्रकरणात गुन्हे दाखल असलेल्या सराईतांची चौकशी सुरु करण्यात आली आहे.बलात्कार प्रकरणातील आरोपींचा माग काढण्यासाठी पोलिसांनी सुमारे ७० पथके तयार केली आहेत. गेल्या पंधरा दिवसात बोपदेव घाटमार्गे गेलेल्या तीन हजार मोबाइल वापरकर्त्यांची माहिती संकलित करण्यात आली असून, या माहितीचे तांत्रिक विश्लेषण सुरु करण्यात आले आहे.

बोपदेव घाटातील मोबाइल संपर्क यंत्रणा क्षीण असल्याने तांत्रिक तपासात अडथळे आले आहेत. आरोपी सासवडमार्गे पसार झाल्याची शक्यता आहे. घटनास्थळापासून ७० ते ८० किलोमीटरपर्यंतचे सीसीटीव्ही चित्रीकरण पोलिसांकडून तपासण्यात येत आहे. तांत्रिक तपासात महत्त्वाची माहिती मिळाली नसल्याने पोलिसांनी पुणे शहर, ग्रामीण भागातील खबऱ्यांचे जाळे पुन्हा कार्यरत केले आहे. पसार आरोपींची माहिती मिळवण्यासाठी गावातील पोलीस पाटील, तसेच सरपंचांची मदत घेण्यात येणार आहे. आरोपींची माहिती देणाऱ्यास दहा लाख रुपयांचे रोख बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. पोलिसांनी घटनास्थळावरुन रक्ताचे नमुने, बांबू, तसेच अन्य साहित्य जप्त केले आहे. संबंधित नमुने तपासणीसाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.